विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००९ |
| वर्ष | : | अकरावे |
| अंक | : | १ |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : १४८**

MAHMARI 19358/13/1/2000-TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा • ठाणे

व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष अकरावे/अंक १/डिसेंबर २००९

## संपादकीय

## कोपनहेगनच्या निमित्ताने

हवामानामधील अनिश्चित बदलांचे परिणाम हा विषय दिवसेन् दिवस गंभीर बनत चालला आहे. 'जागतिक विकास अहवाल : २०१०' या अहवालामध्ये 'हवामानातील बदल व जागतिक विकास' या संदर्भात अशी भीती व्यक्त करण्यात आली आहे की, हवामानातील बदलांची सर्वाधिक झळ जगातील विकसनशील देशांना पोहोचण्याची जास्त शक्यता आहे. या बदलांमुळे होणाऱ्या अंदाजित हानीच्या ७५% ते ८०% हानी या देशांना सोसावी लागणार आहे. (संदर्भ – सायन्स, ६ नोव्हेंबर २००९, या अंकाचे संपादकीय – पृ. ७७१.)

कोपेनहेगन येथे या महिन्यात चालू असणाऱ्या हवामान बदलांसंदर्भातील आंतरराष्ट्रीय परिदेच्या पार्श्वभूमीवर जगभरच या प्रश्नांची व्यापक चर्चा होईल. हवामानामधील बदलांच्या दुष्परिणामांपासून जगातील एकही देश वाचलेला नाही हे त्यामागे कारण आहे. उपरोक्त अहवालात दाट लोकसंख्या असणाऱ्या सागरी किनाऱ्यांवरील, तसेच बेटांवरील देशांबद्दल चिंता व्यक्त करण्यात आलेली आहे. जगातील सर्व समुद्रांच्या पाण्याची पातळी तापमानवाढीमुळे वाढत चालली आहे. बर्फाच्छादित शिखरे, प्रदेश येथील बर्फ वितळण्याचे वेग वाढत आहेत. हे जसे वेगाने घडत आहे तशाच वेगाने किनारी प्रदेशांतील लोकांसमोरील संकटही वाढत चालले आहे. मानवी इतिहासात नोंद नाही, इतक्या अकल्पित प्रमाणात पुरांचे प्रमाण वाढत आहे. परिणामी निर्वासितांचे, बेघरांचे प्रमाणही वाढत आहे.

या सर्व संकटाचा प्रभाव किनारपट्टीपासून दूर असणाऱ्या शेती प्रधान भूभागांवरही वाढत जाणे अपरिहार्य आहे. हवामानातील बदलांचे हे प्रमाण इतक्या मोठ्या व व्यापक स्वरूपाचे आहे की पारंपरिक शेती संकटात येऊ लागली आहे. शेती उत्पादनांमदील अनियमितता, पिकांवरील संकटे या विषयावर अनेक शेतीविषयक नियतकालिकांतून येणारे लेख वाचताना या प्रश्नाची तीव्रता जाणवते. जगभर हे सर्व परिणाम वाढत आहेत. महागाईचा वाढता प्रश्न, बेकारी, आर्थिक मंदी हे सर्व सामान्य माणसाला भेडसवणारे भीषण वास्तव ठरत आहे.

या परिस्थितीत तोडगा कसा काढायचा या संबंधातला एक महत्त्वाचा विचार 'सायन्य'च्या या संपादकीयात आहे.

(पृष्ठ क्रमांक ३९ वर)

# पसायदान



आतां विश्वात्मकें देवें । येणें वाग्यज्ञें तोषावे । तोषोनि मज द्यावे । पसायदान हें ।। १ ।।

जे खळांची व्यकटी सांडो । तया सत्कर्मी रति वाढो । भूतां परस्परें पडो । मैत्र जीवांचे ।।२ ।।

दूरिताचे तिमिर जावो । विश्व स्वधर्मसूर्ये पाहो जो जे वांछिल तो तें लाहो । प्राणिजात ।।३।।

वर्षत सकळमंगळी । ईश्वरनिष्ठांची मांदियाळी । अनवरत भूमंडळी । भेटतु भूतां ।। ४ ।।

चला कल्पतरूंचे आरव । चेतना चिंतामणीचे गांव । बोलते ते अर्णव । पीयूषाचे ।। ५ ।।

चंद्रमे जे अलांछन । मार्तंड जे तापहीन ।ते सर्वाही सदा सज्जन । सोयरे होतु ।। ६ ।।

किंबहुना सर्व सुखी । पूर्ण होऊनि तिही लोकीं ।भजिजो आदिपुरुखीं । अखंडित ।।७ ।।

आणि ग्रंथोपजीविंये । विशेषीं लोकीं इयें । दृष्टादृष्ट विजयें । हो आवें जी ।। ८ ।।

येथ म्हणे विश्वेश्वरावो । हा होईल दानपसावो । येणें वरें ज्ञानदेवो । सुखया जाला ।। ९ ।।

## ❈ सार्थ पसायदान ❈

आता यावर विश्व स्वरूप, सद्गुरु यांनी माझ्या वागयज्ञेकरून संतुष्ट होऊन मजला हा प्रसाद द्यावा, कीं, दुष्टांचा कुटिलपणा जाऊन त्यांना सत्कर्माची प्रीती उत्पन्न होवो; व जीवमात्रांची एकमेकांशी मैत्री वाढो. या सर्व विश्वामधील पापरूपी अंधकार नाहीसा होऊन स्वधर्मरूपी सूर्य उगवून त्याचा प्रकाश होवो आणि प्राणिमात्राच्या ज्या ज्या इच्छा असतील त्या त्या पूर्ण होवोत.

या भूतलावर अखिल मंगलांचा वर्षाव करणाऱ्या भगवत् भक्तांच्या समुदायांची सर्व भूतांना सद्भावेकरून सदोदित भेट होवो. ते भक्तजन कसे आहेत, तर चालते बोलते कल्पतरूचे बाग, जिवंत चिंतामणीचे गाव, किंवा अमृताचे चालते बोलते समुद्रच होत. जे कलंकरहित प्रतिचंद्र, संसाररूपी अधंकार दूर करून शांतिसुख देणारे प्रतिसूर्य असे भगवत् भक्त, ते सकल जीवांना प्रिय होवोत.

फार काय मागावे! सर्व त्रैलोक्यसुखाने परिपूर्ण होऊन प्राणिमात्राला हरीचें अखंड भजन करण्याची इच्छा होवो आणि या ग्रंथावरच ज्यांचे उपजीवन आहे, त्यांना इहलोकचे व परलोकचे सुख प्राप्त होवो !

तेव्हा सदगुरू प्रसन्न होऊन म्हणाले की, तुझ्या म्हणण्याप्रमाणे सर्व होईल. असे वरप्रदान मिळाल्याने श्रीज्ञानदेव फार संतोषित झाले.

(अध्याय अठरावा : ओवी क्र. १७९३ ते १८०१)

# आवाहन

विद्या प्रसारक मंडळ, ठाणे ही संस्था ठाण्यात गेली ७५ वर्षांहून अधिक काळ शिक्षण क्षेत्रात कार्य करीत आहे. मराठी व इंग्रजी शाळांबरोबरच कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, व्यवस्थापन शाखांची महाविद्यालये, तंत्रनिकेतन व प्रगत अभ्यास केंद्र अशा सर्वांगीण शिक्षणाची सोय संस्थेने केली आहे. पाठ्यपुस्तकीय शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या अंगचे कला, क्रीडा इ. क्षेत्रातील गुण विकसित व्हावेत म्हणून विविध उपक्रम संस्था राबवीत आली आहे. या सर्वांच्या परिणामस्वरूप संस्थेचे विद्यार्थी अभ्यास व अभ्यासेतर परीक्षा व स्पर्धांत उत्तम यश मिळवीत असून संस्थेचे माजी विद्यार्थी समाजात विविध क्षेत्रांत कार्यप्रवण आहेत.

दूरदर्शन, सिनेमे व सवंग नियतकालिके भोगवादी, नीतीहीन संस्कृतीचा प्रसार करण्यात अग्रेसर आहेत. याउलट विधायक, संस्कृतिरक्षक विचार पोचवतील अशी माध्यमे अल्पसंख्य आहेत. संस्कारक्षम विद्यार्थ्यांना, वाचकांना, नागरिकांना वैचारिक खाद्य पुरवावे, त्यांच्यात ईर्षा निर्माण व्हावी व त्यांनी अर्थार्जन व व्यावसायिक यशाबरोबरच सामाजिक कार्य साधावे, या उद्देशाने मंडळाने **'दिशा'** हे नियतकालिक जुलै १९९६ पासून सुरू केले आहे.

**या मासिकाचे वर्गणीदार होऊन, या मासिकात जाहिरात देऊन किंवा लेख पाठवून आपण आमच्या कार्याला हातभार लावावा ही विनंती !** तसेच, आपल्या अमूल्य देणग्या देऊनही आपण दिशासाठी हातभार लावू शकता.

संपादक, दिशा
**विद्या प्रसारक मंडळ,**
नौपाडा, ठाणे – ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२ ६२७०

**वार्षिक वर्गणी रु. २५०/–**

अंकाची किरकोळ
विक्रीची किंमत रु. २५/– फक्त.

वर्गणी पाठविताना आपला पूर्ण पत्ता, टपाल सूची क्रमांक (पिनकोड नंबर) व दूरध्वनी क्रमांक कळवावा.

**टीप** : वर्गणी /जाहिरात वा देणगीची रक्कम धनादेशाने पाठवावी. धनादेश (चेक) **''विद्या प्रसारक मंडळ A/c दिशा''** या नावाने पाठवावा.




## वर्ष अकरावे/अंक ७/ डिसेंबर २००९

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
श्री. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १५ वे / अंक ६ वा)

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
www.vpmthane.org

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
Email : perfectprints@gmail.com

# *अनुक्रमणिका*

| | | | |
|---|---|---|---|
| १) | ऑक्सफर्डचे अॅशमोलियन संग्रहालय | डॉ. सुधाकर आगरकर | ३ |
| २) | समान शिक्षणाचा विचार | सौ. विशाखा देशपांडे | ५ |
| ३) | ज्ञानोबा माझा - पूर्वारंभाचा वृत्तान्त | डॉ. प्रदीप कर्णिक | ८ |
| ४) | उपनिषदे : ऋषींनी जगाला दिलेली देणगी | श्री. शं. बा. मठ | ११ |
| ५) | गृहस्वामिनी | श्री. यशवंत माने | १६ |
| ६) | 'संगीत शिक्षकांची भूमिका आणि नव्या शिक्षण प्रणालीची आवश्यकता' | संध्या देशमुख | १८ |
| ७) | (पुस्तक परिचय) मनाच्या श्लोकांची चरणसूची | श्री. मोहन पाठक | २५ |
| ८) | भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना | श्री. यशवंत साने | २७ |
| ९) | परिसर वार्ता | संकलित | ३४ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# ऑक्सफर्डचे ॲशमोलियन संग्रहालय

*ऑक्सफर्ड मधील अनेक वस्तुसंग्रहालयांपैकी एका संग्रहालयाचा परिचय या लेखात आला आहे – संपादक*

ऑक्सफर्ड शहरात अनेक वस्तुसंग्रहालये आहेत. विद्यार्थ्यांची जेव्हा ऑक्सफर्डला शैक्षणिक सहल नेली जाते तेव्हा यांतील काही महत्त्वाच्या संग्रहालयांना भेटी दिल्या जातात. यापैकी एक संग्रहालय आहे ॲशमोलियन संग्रहालय. हे संग्रहालय ऑक्सफर्ड शहराच्या मध्यभागी वसलेले असून ग्लाऊसेस्टर ग्रीन या बस स्थानकावरून हाकेच्या अंतरावर आहे. सकाळी १० वाजता हे संग्रहालय उघडते. त्याचवेळेस आम्ही तिथे पोहोचलो. संग्रहालयात प्रवेश करणारे आम्हीच पहिले पर्यटक होतो. आमच्या मागून अनेक पर्यटक आले. या संग्रहालयात प्रवेश घ्यायला कसलेही शुल्क पडत नाही.



**वस्तुसंग्रहालय इमारत – दर्शनी भाग**

प्रवेशद्वारातून आत जाताच नजरेस पडतात ते मोठमोठे पुतळे. संगमरवर वापरून केलेले हे पुतळे पांढरे शुभ्र असून त्यावरील कलाकुसर खूपच चांगली आहे. या पुतळ्यांमध्ये इंग्लंडमधील अनेक प्रसिद्ध व्यक्तींचे पुतळे आहेत. संगमरवराबरोबरच इतर दगडांमध्ये कोरलेले पुतळे देखील आहेत. मूर्तीकारांनी स्त्री पुरूषांच्या शरीररचनेचा चांगला अभ्यास करून हे पुतळे बनविले आहेत ही बाब सहज लक्षात येते. शरीराच्या विविध अवयवांचा रेखीवपणा उठून दिसतो. हे पुतळे पाहात राहावे असेच वाटते. पुतळ्यांचा विभाग संपवून आपण जेव्हा दुसऱ्या विभागात प्रवेश करतो, तेव्हा आपली नजर भिंतीवर लावलेल्या मोठमोठ्या चित्रांकडे जाते. जगातील प्रसिद्ध चित्रकारांनी काढलेली चित्रे या प्रदर्शनात ठेवलेली आहेत. वेगवेगळ्या काळातील या चित्रांचे निरीक्षण करताना चित्रकलेत कसे बदल होत गेले याची कल्पना येते. चित्रे जरी खूप जुनी असली तरी ती जिवंत वाटतात. प्रत्येक चित्राला शोभेल अशी चौकट लावलेली आहे. त्यांची रचनादेखील आकर्षक आहे. ही चित्रे पाहात पाहात आपण पुढच्या दालनात प्रवेश करतो. या दालनात धातुच्या वस्तू ठेवलेल्या आहेत.

पितळ, ब्रांझ या मिश्रधातूपासून बनविलेल्या अनेक वस्तू काचेच्या कपाटात पद्धतशीर रचून ठेवलेल्या आहेत. मोठ्या आकाराच्या वस्तू स्टँडवर कपाटाबाहेर ठेवलेल्या आहेत. प्लेट, चहाचे भांडे याचबरोबर काही मूर्तीदेखील आपल्याला येथे आढळतात. दालनातील वस्तूंचे निरीक्षण करीत आपण जेव्हा पुढे जातो तेव्हा काचेच्या विभागात प्रवेश करतो. येथे काचेपासून बनविलेल्या अनेक प्रकारच्या वस्तू ठेवलेल्या आहेत. काचेत धातूचे ऑक्साइड मिसळून काचेला रंग आणतात. अशा पद्धतीने बनविलेल्या रंगीत काचेपासून अनेक वस्तू बनविलेल्या आहेत. त्या सर्वांचे पद्धतशीर प्रदर्शन संग्रहालयाच्या एका दालनात भरविलेले आहे. त्याच्याच शेजारच्या दालनात चिनी मातीच्या वस्तू ठेवलेल्या आहेत. अगदी लहानशा वाटीपासून ते मोठ्या

पात्रापर्यंत वेगवेगळ्या आकाराच्या वस्तू येथे आहेत. त्यातील प्रत्येक वस्तूवर रंगीबेरंगी नक्षीकाम केलेले आहे.

अशमोलियन संग्रहालयात एक विभाग आहे आशिया खंडाचा. या परिसरात सापडणाऱ्या अनेक वस्तूंचा संग्रह येथे करून ठेवलेला आहे. आशिया खंडाच्या विविध भागांत आढळणाऱ्या मूर्ती येथे पद्धतशीरपणे ठेवलेल्या आहेत. या मूर्तींमध्ये आपले लक्ष वेधून घेते ती विष्णूची मूर्ती. व्यापाराच्या निमित्ताने जेव्हा इंग्रज येथे आले तेव्हा येथील काही वस्तू ते घेऊन गेले. सुरुवातीच्या काळात नेलेल्या वस्तूंमध्ये या विष्णूच्या मूर्तीचा समावेश होतो. धातूच्या या मूर्तीचे वेगवेगळे भाग अगदी रेखीवपणे दिसतात. खाली अगदी कमी उजेडात काढलेले या मूर्तीचे चित्र छापलेले आहे. त्यावरून या मूर्तीची कल्पना येईल.



**श्री विष्णूची मूर्ती**

प्राचीन नाण्यांचा अभ्यास हा ऑक्सफर्ड विद्यापीठातील महत्त्वाचा अभ्यास विषय आहे. या अभ्यासाला मदत व्हावी म्हणून या संग्रहालयात जुनी नाणी संग्रहित करून ठेवलेली आहेत. युरोपीयन राजवटीतील नाण्याबरोबरच आशिया खंडातील राजवटीतील नाणी येथे पाहायला मिळतात. राजा चंद्रगुप्त मौर्य, राजा शिवाजी यांसारख्या भारतीय राजांच्या राजवटीतील नाणी येथे आहेत. या नाण्यांची देखभाल करणारी व्यक्ती महाराष्ट्रीयन असून मुळची पुण्याची. त्या व्यक्तीने आम्हाला वेगवेगळ्या देशातील नाणी दाखविली. त्याचबरोबर आमच्या सोबत आलेल्या विद्यार्थ्यांशी चर्चा केली. एवढ्या दूर अंतरावर आपल्या भाषेत बोलणारा माणूस भेटला याचे विद्यार्थ्यांना अप्रूप वाटले. त्यांनी त्याच्यावर अनेक प्रश्नांचा भडिमार केला. त्यानेही त्या सगळ्या प्रश्नांची न कंटाळता उत्तरे दिली.

**डॉ. सुधाकर आगरकर**
सी–१४, विसावा वैभव नगरी,
कल्याण शीळ रोड, काटई, ता. कल्याण
जि. ठाणे – ४२१२०४

●●●

**या वस्तुसंग्रहालयाबद्दल**

ऑक्सफर्डमधील ॲशमोलियन या वस्तुसंग्रहालयाबद्दल माहिती देणारा एक परिचय लेख 'एशियन आर्ट' च्या ऑक्टोबर २००९ च्या अंकामध्ये आहे. ५ मजल्यांचा विस्तार असणाऱ्या या वस्तुसंग्रहालयात ३९ नवीन दालने आहेत. यांत सुल्तान–बिन–अब्दुल–अझीझ अल्–सौद हे इस्लाम कलेचे दालन, आशियाई कलांचे दालन, भारत व जपानची दालने इ. दालनांचा समावेश आहे. या वस्तुसंग्रहालयाची माहिती माहितीच्या महाजलात www.ashmus.ox.ac.uk या संकेतस्थळावरही उपलब्ध आहे.

(एशियन आर्ट : ऑक्टो. २००९ वरून)

# समान शिक्षणाचा विचार

*शिक्षणात भेदाभेद निर्माण करणारी पद्धत जायला हवी. शैक्षणिक साधनांचा नीट विचार व्हायला हवा. तरच शिक्षण प्रक्रिया आनंददायी ठरेल – संपादक*

मंडळी, आपल्यापैकी सर्वच जण पालक आहात. काही जण शिक्षक, मुख्याध्यापक किंवा शैक्षणिक संस्था चालक असाल. पालक असाल तर निरनिराळ्या वयोगटातल्या मुलांचे पालक असाल. शिक्षण क्षेत्रातले व्यवसायिक असाल, तरीही निरनिराळ्या वयोगटातील विद्यार्थ्यांचे असाल. आपण प्रत्येक जण, आपले मूल किंवा आपला विद्यार्थी हा साक्षर होऊन आजच्या या स्पर्धात्मक जगामधे टिकून रहाण्यासाठी जास्तीत जास्त टक्केवारी कमावून पुढे कसा जाईल याचाच सतत विचार करत असतो. पण या जगात पुढे जाण्यासाठी जी शिकण्याची प्रक्रिया सतत चालू असते ती आनंददायी आहे का? या प्रक्रियेमधे मूल खरंच काही शिकलंय का प्रौढांनी शिकवलेल डोक्यात कोंबून, घोकून, ते परीक्षेत ओकलंय अशी स्थिती आहे? हे आपल्या कोणाच्याच लक्षात येत नसतं. ही प्रक्रिया स्वाभाविकपणे वर्षानुवर्ष अशीच घडत असते.

आज आपण अशा शिक्षण पद्धतीची चर्चा करणार आहोत की, जी खरं तर मूलभूत अशा स्वरूपाची, नवीन नसलेली परंतु चोखंदळपणे न वापरली गेलेली किंवा क्वचितच वापर केली गेलेली आहे. छापील पुस्तक, ready made गाईड या सर्वांमधे हरवून गेलेली अशी, साधनाधारित शिक्षण पद्धती. या साधनाधारित शिक्षण पद्धतीबद्दल सविस्तर जाणून घेण्याआधी आपल्या सध्याच्या प्रचलित शिक्षण व्यवस्थेकडे पाहू. १५० वर्षांपूर्वी ब्रिटिशांनी जी शिक्षण पद्धती घालून दिलेली आहे तीच आजही प्रचलित आहे. ही शिक्षणपद्धती साचेबद्धपणा असलेली आणि वर्तनवादी अशी आहे. या पद्धतीमधे अभ्यासक्रमामधे लवचीकता नाही, मुलांच्या सर्जनशीलतेला वाव नाही, शिक्षकांच्या कल्पकतेला वाव नाही. शिस्तीचा बाऊ करणारी, स्पर्धांना प्रोत्साहन देणारी, आणि मुलांच्या विचार स्वातंत्र्यावर घाला घालणारी अशी ही पद्धती आहे. आपल्या देशामधे सांस्कृतिक, भौतिक विविधता आहे. त्यातूनही वेगवेगळे आर्थिक–सामाजिक स्तर आहेत. मग आजची ही शिक्षण पद्धती ही सार्वत्रिकरीत्या वापरता येणारी आहे का आणि मग, आपल्या देशाचं वैविध्य लक्षात घेता, सार्वत्रिकरीत्या ही वारपता येत नसेल तर मग ती समाधानकारक आहे का? आपल्य घटनेत असं सांगितल आहे की प्रत्येक मुलाला शिक्षणाचा मूलभूत हक्क आहे. तरीही आज, शिक्षणापासून वंचित राहिलेली कितीतरी मुलं आहेत, ज्यांना शाळेत जाताच येत नाही. त्यांच्यासाठी मग पर्यायी शिक्षण व्यवस्था आहे का? काही ठिकाणी ऊस तोडणी कामगारांच्या मुलांसाठी साखर शाळा, विटभट्टीवरील बालमजुरांसाठी भोंगा शाळा अशा प्रकारचे प्रयोग झालेत पण ते अपवादच. शिवाय आपल्याकडे समाजातल्या वेगवेगळ्या स्तरातल्या मुलांना मिळणाऱ्या शिक्षणाचा दर्जा बदलत जातो. शिक्षणाचा दर्जा बदलत जातो म्हणजे त्यांच्या सामाजिक आर्थिक उतरंडीसारखी शैक्षणिक दर्जाचीही उतरंड व्हायला लागते. म्हणजे मग ग्रामीण/आदिवासी भागातल्या शाळा, मध्यम वर्गीयांच्या मुलांच्या शाळा, श्रीमंतांच्या शाळा यांच्या शैक्षणिक दर्जामधे पण फरक आणि तफावत असते. या तफावतीचं कारण हे केवळ आर्थिक समाजिक नाही तर कालबाह्य झालेली शिक्षण पद्धती आणि शिक्षकांची गुणवत्ता हे ही कारण

आहे. शिक्षकांची उदासीनता, अनास्था किंवा अज्ञान हेही एक कारण आहे. शिवाय त्यांच्यावर असलेल्या अशैक्षणिक कामांचा बोजा. अशैक्षणिक म्हणजे शिक्षणबाह्य कामे म्हणजे election duty, जनगणना, कार्यालयीन कारकुनी काम जशी की फी गोळा करणं, Form भरणं वगैरे. एकूण काय तर शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणामधे शिक्षणाच्या दर्जाला महत्त्वच दिलं जात नाही.

आपल्याकडे आपल्याला अशी शिक्षणपद्धती हवी आहे की जी आपल्यासारख्या वैविध्यपूर्ण देशातल्या सर्व स्तरांवरच्या मुलांसाठी समान शिक्षण देऊ शकेल. जी श्रीमंतानाही लागू पडेल आणि गरीबांनाही. जी खेड्यातल्या मुलांनाही लागू पडेल आणि शहरातल्या मुलांनाही. प्रत्येक मूल हे वेगळं असतं, तरीही सर्व मुलं सारखीच असतात. म्हणजे काय तर सर्व मुलांची वाढ ही निसर्गदत्त अशीच असते. परंतु प्रत्येकाच्या नैसर्गिक विकासाचे टप्पे सारखे नसतात. आपल्याला मग अशी शिक्षण पद्धती हवी जिचे आपल्या देशातल्या वेगवेगळ्या मातृभाषेतल्या मुलांना सहज आकलन होईल. जी भेद करणारी नसेल. आणि अशी शिक्षण पद्धती कोणती तर साधनाधारित शिक्षणपद्धती.

या शिक्षणपद्धतीचे गुण असे की, ती खऱ्या अर्थाने स्वयंअध्ययनाची पद्धत आहे. मुलांना मारून मुटकून, धाक दाखवून, भीती घालून त्यांचं शिक्षण होत नसतं. तर आनंददायी वातावरणात, हसत खेळत नैसर्गिक गतीने शिक्षण घडवून आणणारी आहे. शैक्षणिक साधनं अवती भोवती असतील तर मुलं आपल्या गतीने, आपल्या सवडीनुसार, आपल्या कलाने ती हाताळतात आणि स्वत:चं शिक्षण स्वत:च घडवून आणतात. चित्रवाचन, चित्रपट्ट्या, वस्तू वर्णन, जोड्या लावणे, मॅचिंग करणे यामधून त्यांचा भाषा विकास होत असतो. व्याकरण शिकत असतात. गणितातल्या गणनपूर्व संकल्पना, जशा– तुलना करणे, वर्गीकरण करणे, एकास एक संगती लावणे, क्रमवारी लावणे अशा संकल्पना स्पष्ट होत असतात. त्यातून ते संख्या ओळखायला शिकतात. मोजणी करणे, बेरीज–वजाबाकी करणे, पाढे तयार करणे अशा गोष्टी अगदी सहज आत्मसात करतात. या ठिकाणी त्यांना पालक किंवा शिक्षकांच मार्गदर्शन घ्यावं लागतं, परंतु त्यांना शिकवावं लागत नाही.

या पद्धतीचा दुसरा गुण म्हणजे मुलं लक्ष केंद्रित करायला शिकतात. साधनांवर काम करता करता ती त्यामधे गुंतून जातात आणि मन प्रथम ३ मिनिटे असणारी एकाग्रता ५ मि., ७ मि., १०मि. अशी वाढत जाते. आणि मग मन केंद्रित करण्याची सवय लागते. हेच यशाच्या वाटचालीचं पुढचं पाऊल ठरू शकतं.

शैक्षणिक साधनांमुळे प्रभावी अध्ययन तर होतंच पण कधी कधी निर्मितीचा आनंद पण मिळतो. शैक्षणिक साधनं कशी असावीत? तर याचे ३ गट पाडता येतील –

१) संकल्पना स्पष्टीकरणाची साधनं – ही शिक्षकांनी मुलांसमोर नवीन कल्पना मांडण्यासाठी असावीत.

२) दृढीकरण किंवा सरावासाठीची साधनं – जी मुलं स्वत: हाताळून संकल्पनेचं दृढीकरण करतील.

३) मूल्यमापनाची साधनं – एखादी संकल्पना कितपत समजली आहे, कौशल्य किती विकसित झालं आहे, याचं मूल्यमापन शिक्षक करू शकतो.

ही तीनही प्रकारची साधनं वेगवेगळी असावीत. साधनांमधील रंजकता कशी वाढवावी? तर जगातील कोणतीही गोष्ट अगदी दगड–माती पासून, फळं, भाज्या, साली, बियांपर्यंत तर लाकडी ठोकळ्यांपासून ते कोल्ड ड्रिंकच्या बाटल्यांचे बिल्ले झाकणांपर्यंत काहीही शैक्षणिक साधनं म्हणून वापरता येतात. मुलांना ज्यामधे सरकपट्टा,

चक्र, जुळवणी संच, puzzle, फासे असं जर त्यांच्या समोर असेल तर खेळता खेळता शिकणं होत असतं. खूप महाग सामान न वापरता कल्पकतेने निवडून स्वस्त, टिकाऊ आणि मुख्य म्हणजे मुलांना हाताळता येईल अशी साधनं असावीत. स्वस्त असली की ती तुटली, मोडली तरी दु:ख होत नाही. जुन्या वहीचे पुठ्ठे, जुन्या पुस्तकांमधून कापलेली चित्रं, वर्तमान पत्रातली चित्रं, कॅलेंडरवरची चित्रं, कॅलेंडरच्या पानांची मागची बाजू, त्यावरील आकडे वगैरे, आपण ज्या गोष्टी कचऱ्यात टाकतो त्याकडे या नजरेने बघितलं तर अशा अनेक वस्तू शैक्षणिक साधन म्हणून उपयोगी पडतात.

साधन विकत घेताना किंवा तयार करताना काय निकष लावाल? तर आमूक एक साधन वापरण्या मागचा हेतू काय आणि तो या साधनामधून गाठता येईल का? या साधनामुळे मुलांना कृती करायला वाव आहे का? यामुळे अध्ययन रंजक होईल का? मुलांच्या बुद्धीला आव्हान वाटेल का? विचार करावा लागेल का? आणि साधन तयार करत असताना कोणत्या उद्देशासाठी किती वेळ तयार करायला घालवायचा, हे विचारात घ्यायला हवं.

अशा प्रकारची शिक्षणपद्धती असेल तर ती नक्कीच सुखकारक आणि आनंददायी असेल.

(*आकाशवाणीच्या अस्मिता वाहिनीवरून प्रसारित झालेल्या व्याख्यानाचे हे लेख रूप आहे. आकाशवाणीच्या सौजन्याने ते मुद्रित करीत आहोत – संपादक)

**सौ. विशाखा देशपांडे**
सौ. आनंदीबाई जोशी
इंग्रजी माध्यम शाळा, नौपाडा, ठाणे.

●●●

## वीज बचतीसाठी

❖ काही खोल्यांत 'टास्क लायटिंग'चा वापर करा. उदा., अभ्यासाच्या टेबलासाठी टेबल लँप बसवणे. अशा गोष्टींमुळे तेवढ्या कृतींपुरतेच आणि कमी तीव्रतेचे दिवे वापरले जातात आणि संपूर्ण खोलीसाठी दिवा वापरणे टळते.

❖ रेफ्रिजरेटमध्ये कोणतेही द्रव पदार्थ उघडे ठेवू नका. अशा द्रवपदार्थांतून वाफ बाहेर पडते. जिचे पाण्यात रूपांतर करण्यासाठी रेफ्रिजरेटर जास्त वीज वापरतो.

❖ तुमचा गीझर शॉवरला जोडू नका. खूप वेळ गरम पाण्याने शॉवर घेतल्यामुळे आपण खूप वीज वाया घालवत असतो.

❖ धुलाई यंत्रात गरजेपेक्षा जास्त डिटर्जंट पावडर घालू नका. जास्त पावडर घातल्यास आपले यंत्र जास्त 'रिन्स' होते, म्हणजे जास्त फिरते आणि त्यामुळे वीज जास्त लागते.

❖ खोल्यांना हलक्या स्वरूपाचे रंग द्या. म्हणजे त्यातून जास्त प्रकाश परावर्तित होईल आणि तुलनेने विजेचीही बचत होईल. गडद रंग जास्त प्रकाश शोषून घेतात. भिंतीवरील धूळ कमी करा, म्हणजे त्यातून जास्त प्रकाश परावर्तित होईल.

❖ दिवे लावताना अशी जागा निवडा, जी शक्यतो दोन भिंतींमध्ये येईल. दिवा कोपऱ्यात लावल्यामुळे दोन्ही भिंतींच्या पृष्ठभागावरून प्रकाश परावर्तित होतो आणि दिव्याचा कमाल वापर होतो.

❖ धुलाई यंत्र कधी वापराचे, याचा एखादा दिवस किंवा आठवड्यातील दोन तीन दिवस ठरवून घ्या. म्हणजे त्या दिवशी कुटुंबातील सर्व सदस्यांचे कपडे एकाच वेळी धुता येतील आणि धुलाई यंत्राचा वापर मर्यादित राहिल.


❖ धुलाई यंत्र विकत घेताना ज्यांचा 'स्पिन'चा वेग जास्त असेल, ते कपडे जास्त जोराने पिळतात आणि त्यामुळे कपडे वाळण्याचा वेळ वाचतो. पर्यायाने अशा धुलाई यंत्रामुळे वीजही वाचत असल्याने असेच यंत्र निवडा.

संग्रहातून

# ज्ञानोबा माझा - पूर्वारंभाचा वृत्तान्त

*श्रीसंत मामासाहेब देशपांडे यांनी लिहिलेले 'ज्ञानोबा माझा' हे नाटक २५ ऑक्टोबर रोजी रंगमंचावर आले. तत्पूर्वी त्याचा पूर्वारंभ झाला. त्या पूर्वारंभाचा हा वृत्तान्त – संपादक*

वै. श्रीसंत मामासाहेब देशपांडे लिखित, 'श्रीपाद सेवा मंडळ' निर्मित व ऋग्वेद प्रकाशित 'ज्ञानोबा माझा' या संतश्रेष्ठ श्रीज्ञानेश्वर माउलींच्या जीवनावर आधारित नाटकाचा पूर्वारंभ (Curtain Raiser) बुधवार दिनांक २१ ऑक्टोबर २००९ रोजी दुपारी ४.३० वाजता यशवंत नाट्यमंदिर, माटुंगा येथे आयोजित केला होता. या पूर्वारंभास नाट्य, पत्रकारिता आणि विविध वाहिन्यांवरील अनेक नामवंत कलाकार, पत्रकार, साहित्यिक व्यक्ती उपस्थित होत्या. विविध नामवंतांच्या उपस्थितीत 'ज्ञानोबा माझा' या दोन अंकी नाटकातील काही प्रवेशांची झलक रंगमंचावर नेपथ्यासह सादर झाली आणि मान्यवरांनी कलाकारांच्या अदाकारीला उत्स्फूर्तपणे दाद दिली. सदर नाटकाचा २५ ऑक्टोबर रोजी मुंबईच्या साहित्य संघ मंदिरात शुभारंभ झाला.



काही प्रवेश आणि प्रवेशांना जोडणारे सूत्र सादर झाल्याने उपस्थितांना नाटकाची कल्पना आली. हे प्रवेश झाल्यानंतर नाट्यगृहातील काही मान्यवरांच्या मुलाखती घेऊन खास आमंत्रितांना नाटक कसे वाटले, याचाही अंदाज ऋग्वेद तर्फे घेण्यात आला.

दिग्दर्शक अशोक समेळ यांचे चिरंजीव व उगवते कलाकार म्हणून ख्यातनाम होत असणारे संग्राम समेळ आणि सौ. आगाशे यांनी प्रेक्षागृहात येऊन थेट प्रेक्षकांशी संवाद साधला आणि सदर कार्यक्रमामागचा हेतू विशद करून रंगमंचावर एकेका मान्यवरांना पाचारण केले.

आळंदी येथून खास माउलींचा आशीर्वाद घेऊन श्री. राजाभाऊ चोपदार व विश्वस्त डॉ. सारंग जोशी यांना प्रथम बोलावून प्रारंभच मुळी आळंदीच्या शुभाशीर्वादाने झाला. श्री. राजाभाऊ म्हणाले की, ''मी पोस्टमन म्हणून माउलींचा आशीर्वाद घेऊन आलो आहे. प.पू.श्री. मामांचे लेखन अभ्यासपूर्ण असते. त्यांचे नाटकही तसेच आहे. या मुलांनी समाधी समोर काही प्रवेश केले, तेव्हा सर्वांच्या अंगावर रोमांच उभे राहिले होते. मला खात्री आहे, जनता हे नाटक डोक्यावर घेईल. माउलीच या नाटकाला यश देणार आहेत.''

आळंदी संस्थानचे विश्वस्त डॉ. सारंग जोशी यांनी, आजच्या घसरत्या सामाजिक-सांस्कृतिक परिस्थितीचा संदर्भ देऊन ''विश्वाची माझे घर'' हा संदेश जगापुढे जाण्याची गरज असल्याची आवश्यकता आहे, हे सांगून हे नाटक जगापुढे हा संदेश नेईल असा विश्वास व्यक्त केला.

प्रेक्षकांमध्ये प्रख्यात नामवंत अभिनेते प्रभाकरपंत पणशीकर उपस्थित होते. त्यांना या नाटकाबद्दलची प्रतिक्रिया विचारली असता ते म्हणाले, ''कवीश्रेष्ठ कुसुमाग्रजांनी 'जे जे जगी जगते तया, माझे म्हणा' असं

ऐषोआरामातील सुखापेक्षा काबाडकष्ट करून मिळवलेलं यश आनंददायी असतं.

म्हटलंय. हाच संदेश श्रीज्ञानेश्वरांनी ७०० वर्षापूर्वी देऊन ठेवलाय. श्रीज्ञानेश्वरांची भूमिका करणारी ही जी मुलगी आहे तिच्या चेहऱ्यावर जो वैश्विकतेचा भाव आहे तो फार महत्त्वाचा आहे. हा भाव सर्वत्र नेण्याचे महान कार्य ही संस्था आत्मीयतेने करेल. नाटकाचे संगीत इतके अप्रतिम आहे की, ते कमाल करेल. नाटकातले 'नामदेव' काय छान नाचलेत.'' सर्वच उत्तम असल्याचे सांगून त्यांनी सर्वांना शुभेच्छा दिल्या.

मराठी रंगभूमीवरचे यशस्वी गायक नट श्री. प्रसाद सावकार यांचीही प्रतिक्रिया तितकीच उत्तम ठरली. त्यांनी असे नमूद केली की, ''चाली इतक्या अप्रतिम व सुरेख आहेत की या नाटकाचे खूप प्रयोग होतील.'' त्यांनी आपल्या भूमिकेलाही उजाळा दिला. ते म्हणाले की, ''भालचंद्र पेंढारकरांनी ज्ञानेश्वरांवर एक नाटक रंगभूमीवर आणले होते व त्या नाटकात मी ज्ञानेश्वरांची भूमिका केली होती, पण आज सादर झालेले ज्ञानेश्वर हे खरेखुरे ज्ञानेश्वर वाटतात. याचे शेकडो प्रयोग व्हावेत अशा माझ्या शुभेच्छा.''

श्रीज्ञानेश्वरांची भूमिका करणारी वेदश्री अगाशे हिला चौथीत शिष्यवृत्ती मिळाली होती. लवकरच सीडी सुद्धा प्रकाशित होत आहे. ''पुढच्या वर्षी ९-१० वीचे वर्ष असतानाही हे नाटक तू कसे काय स्वीकारलेस?'' असा प्रश्न तिला विचारला असताना ती म्हणाली की, ''मी दोन्ही गोष्टी उत्तम करेन. मला टेन्शन वाटत नाही. विश्वास वाटतो.''

नाटकाचे दिग्दर्शक अशोक समेळ यांनी या नाटकाबाबत, विशेषत: नेपथ्याबाबत विशेष समाधान व्यक्त केले. प.पू.श्री. मामांच्या नाटकाची मोहिनी त्यांना पडली होती याची कबुली त्यांनी दिली.

''माउलींचं जीवन म्हणजे यज्ञ आहे. त्याचा प्रतीक म्हणून मी नेपथ्यात वापर केलाय'' असं सेटचं वर्णन करणारं भाष्य कल्पक नेपथ्यकार राजन भिसे यांनी व्यक्त केलं. शुभ्र रंगाचा वापरही माउलींच्या तत्त्वज्ञानाचं प्रतीक म्हणून तिथे आला आहे. हे नाटक व्हावं ही माउलींची इच्छा आहे. आपली त्यातली एक छोटीशी समिधा इतकंच आपलं योगदान असं मी मानतो'' असं भिसे म्हणाले.

नाटकातील पदांना चाली देणारे प्रख्यात संगीतज्ञ आणि विविध प्रयोग करणारे डॉ. विद्याधर ओक यांना 'या नाटकात कोणता वेगळा प्रयोग केलाय?' असा प्रश्न विचारला असता, ते म्हणाले की, ''प्रयोग नाही केला. 'संनस्त ज्वालामुखी' करताना मी २०० वर्षे मागचे संगीत आणले; आता ७०० वर्षे मागे गेलोय. संगीताची अभिजात परंपरा उभी केली असून रागसंगीताचा वापर केला आहे. अप्रचलित राग उदा. चंद्रकंस, सरस्वती इत्यादी दिले आहेत. हे संगीत दुर्गम न वाटता प्रेक्षकांना सुगम वाटेल. हा प्रयोग नसून माझ्या कुंडलीतील मोठा योग आहे असे मी मानतो.''

'झी २४ तास' या वाहिनीचे श्री. भूषण खोत यांनी अत्यंत प्रांजळ प्रतिक्रिया नोंदवली. ''आमच्या पिढीने असं नाटक पाहिलं नाही'' असं नमूद करून ते म्हणाले की, ''आमच्या पिढीला या नाटकाचा फार मोठा उपयोग होणार आहे.''

या नाटकाचे निर्माते प्रमुख श्री. शिशिर जोग यांनी असं मांडलं की, ''मी मुळात 'इंद्रधनु' संस्थेचा कार्यकर्ता. वारीवरचा कार्यक्रम करताना या नाटकाचा विषय निघाला आणि एक बहुमान म्हणून मी ही जबाबदारी स्वीकारली.''

ख्यातनाम सर्जन आणि ज्ञानेश्वरीचे थोर अभ्यासक, इंग्रजी भाषेत ज्ञानेश्वरी नेणारे एक महत्त्वाचे भाष्यकार डॉ. रवीन थत्ते यांनी अत्यंत गौरवाने नाटकाची प्रशंसा केली. ते असं म्हणाले की, ''ज्ञानेश्वरांसारखा लोकोत्तर पुरुष जगात झाला नाही. तत्त्वज्ञान, प्रेम, आर्तता, संगीत,

काव्य अशा विविध बाबी एकत्र येतात, त्या केवळ ज्ञानेश्वरांच्याच ठायी. ते तत्त्वज्ञान पुढे न्यायला हवे. त्याला प्राधान्य हवे. कार्यक्रम सुंदर झाला. मी यासाठी जी काही मदत लागेल ती द्यायला तयार आहे.'' असे आश्वासनही त्यांनी दिले.

श्रीपाद सेवा मंडळाचे विश्वस्त जयंत साठे आणि जयंत देसाई यांनीही आपले विचार व्यक्त केले. ''सर्वांच्या सूचनांचा आम्ही अंतर्भाव करू'' असे आश्वासनही त्यांनी दिले.

'जयदेव जयदेव जय ज्ञानदेवा' या पदावर या कार्यक्रमाची सांगता झाली. दोन तास प्रेक्षक मोहरून गेला होता. ज्ञानेश्वरी व ज्ञानदेवांवर प्रेम करणाऱ्या प्रेक्षकांनी या कार्यक्रमाला गर्दी केली होती. चहा पानाच्या कार्यक्रमात सर्वांनी या नाटकातील अभिनेत्यांना गराडा घातला होता व त्यांच्या अभिनयाचे कौतुक केले जात होते.

**डॉ. प्रदीप कर्णिक**
फ्लॉवर व्हॅली, नारळीपाडा,
हायवे, ठाणे - ४०० ६०१
दूरध्वनी : २५४७६१४५

●●●

## पाणी

पाणी हे जीवन आहे
त्याचा नीट वापर करा.
पाणी हे संपत्ती आहे
त्याचे संधारण करा,
त्याचे नियम पाळा.
पाण्याचा आवश्यक तो व
काटेकोरपणे वापर करा.

## *संवादातील आत्मा हरवतोय!*

*एकमेकांशी संवाद साधण्याला मदत करणारी अत्याधुनिक उपकरणे अवतरल्यापासून संवादाला एक वेगळाच अर्थ प्राप्त झाला आहे. ऑनलाईन ब्लॉग्ज, सामाजिक विषय किंवा आर्थिक व्यवहारांना वाहिलेली संकेतस्थळे, चॅटरूम, ई-मेल आणि एसएमएस ही संवादाची माध्यमे वेगाने लोकप्रिय होत आहेत. महानगरातील वाहतुकीला तोंड देत मित्राच्या घरापर्यंत प्रवास करणे जिकिरीचे असल्याने त्याला 'हाय' म्हणणारा एसएमएस पाठवणे अधिक सोयीचे ठरते. या गदारोळात संवादाचा आत्मा हरवत तर नाही, याकडे लक्ष देणे आवश्यक बनत आहे.*

*चटकन संवाद साधणे केवळ तंत्रज्ञानाच्या सहाय्याने शक्य होत आहे. काही कंपन्यांनी तर अधिकारी वर्गाने ई-मेलच्या माध्यमातूनच एकमेकांशी संपर्क साधावा, असे फर्मानच काढले आहे. बरेच अधिकारी ई-मेल वाचून त्यांना उत्तरे देण्यासाठी काही वेळ राखून ठेवत आहेत. ई-मेलद्वारे साधलेल्या संवादाच्या नोंदी ठेवता येतात. शिवाय या प्रकारात नेमका संवादही साधला जात असल्याने वेळही वाचतो. त्यामुळे बऱ्याच कंपन्यांमधील चर्चा कमी होत असून अधिकारी अगदीच महत्त्वाच्या मुद्यावर चर्चा करायची असेल, तर बैठकीचे आयोजन करतात.*

●●●

# उपनिषदे :
## ऋषींनी जगाला दिलेली देणगी
## (लेखांक १)

*उपनिषदांसंदर्भातील लेखमाला या अंकापासून सुरु होत आहे. या संदर्भात काही प्रश्न असल्यास वाचकांनी अवश्य पाठवावेत ते श्री. शंकरराव मठ यांच्याकडे देण्यात येतील - संपादक*

**सामान्य माहिती :**

हजारो वर्षापूर्वीच्या आपल्या ऋषीमुनींच्या आंतरिक अनुभवाच्या गोष्टी उपनिषद ग्रंथात ग्रथित केलेल्या आहेत. हा काळ साधारणपणे चार ते पाच हजार वर्षांपूर्वीचा असावा. तो काळ गीतेच्याही पूर्वीचा मानावा लागेल. कारण गीता सर्व उपनिषदांचे सार आहे. गीता ध्यानातील एक श्लोक असा आहे की, ''सर्वोपनिषदा गावो दोग्धा गोपाल नन्दन:।'' उपनिषदरूपी गाईचे श्रीकृष्णाने दोहन केले. ''पार्थो वत्स: सुधी: भोक्ता दुग्धं गीतामृतं महत्'' अर्जुनाला वासरू मानले आणि हे दिव्य अमृतरुपी दूध ज्ञानी प्राशन करते झाले. उपनिषदे ही एकाच ऋषीची स्फुरणे आहेत असे मात्र म्हणता येणार नाही. अनेक ऋषींच्या अखंड परंपरेतून निर्माण झालेले हे ग्रंथ आहेत. हा काळ मानवी युगातील अत्युच्च उज्ज्वलतेचा असे मानावयास हरकत नाही. कारण या काळात सत्पशोधनाची पराकाष्ठा आढळते. उपनिषदे ही उत्स्फूर्त वचने असल्याने त्यात तर्क शुद्धतेपेक्षा काव्य अधिक आहे. इथे सत्याला तर्काने तेजाळले नसून ऋषीमुखातून ओसंडून बाहेर पडणारे ते आनंदोग्दाराचे जिवंत झरे आहेत. म्हणूनच, इथे शास्त्र शुद्धता वा तर्क कर्कशता आढळत नाही. अंतिम सत्याच्या संबंधी केलेल्या चिंतनातून स्फुरलेले हे सहज विचार आहेत.

**वेदातील उत्कृष्ट भाग :**

वैदिक वाङमय फार व्यापक आहे. त्याला एखाद्या अरण्याची उपमा दिल्यास फारसे चुकेल असे वाटत नाही. अरण्यातून वाट काढणे, मार्ग शोधणे, अति कठीण, खांच खळगे, सर्वत्र भाजलेले तृण, इतस्तत: पसरलेली मोठमोठाली घनदाट वृक्षराजी, या सर्वांनी अरण्य व्याप्त असल्यामुळे एखाद्या पांथस्थाला तिथे भांबावल्यासारखे होईल. त्याला काही समजेनासे होईल. आपण आता या अरण्यात हरवून जाऊ या कल्पनेने तो पांथस्थ गांगरूनही जाईल. परंतु जरा धैर्य अंगी आणून अत्यंत कुशलेने व दमदारपणे मार्ग काढण्याचा प्रयत्न केल्यास त्याला मार्ग तर मिळेलच शिवाय त्याला सुरेख फुलांचे ताटवे आढळतील, वृक्षावर मधुर फळे लटकलेली दिसतील, स्वच्छ व सुंदर झरे लागतील. सर्वत्र सुगंधानी व्याप्त असलेला तो प्रदेश असल्याचे ध्यानात येईल. किती रम्य स्थळ आहे असे अनुभवाला आल्याने तो मोहून जाईल. त्याचे सारे परिश्रम दूर होतील. या उत्कृष्ट स्थळामुळे तो प्रमुदित होईल. वेदांच्या बाबतीतही असेच आहे. वेदांतील अति उत्कृष्ट स्थाने म्हणजेच ही उपनिषदे होत. उपनिषदात अलौकिक तत्त्वज्ञान अगदी काठोकाठ भरलेले आहे. उपनिषदे ही ऋषींनी जगाला दिलेली देणगी आहे. ज्ञान हे कोणत्याही राष्ट्राची मिरासदारी असू शकत नाही. ते अखिल मानवासाठी मुक्त आहे. उपनिषदेही याला अपवाद नाहीत. त्यातील तत्त्वे अति गूढ असली तरी ती

सार्वजनीक व सार्वकालीन असल्याने ती अखिल मानवाच्या अनुभवाचीच आहेत.

**उपनिषद याचा अर्थ :**

सद् या धातूला उप+नि हे दोन उपसर्ग लावून हा शद्ब तयार झाला आहे. उप-जवळ नि-संपूर्ण, निखिल, सर्व आणि सद्-शिथिल करणे, नाश करणे, प्राप्त-करणे असे त्याचे अर्थ आहेत. इथे प्रस्तुत संदर्भात गुरुजवळ बसून विद्या प्राप्त झाल्यावर संसार बंध सर्वांशाने शिथिल होतात. शिष्याला आत्मप्रचिती येते. अथवा शिष्याचे संपूर्ण अज्ञान नाहीसे होते. प्राणी हा मर्यादित ज्ञानामुळे बद्ध होतो. सर्व विद्येत श्रेष्ठ अशी जी विद्या, ती आत्मविद्या अगर ब्रह्मविद्या होय. असे गीतेत प्रतिपादन केले आहे. म्हणून उपनिषदे म्हणजे ब्रह्मविद्या असे म्हटले जाते.

**ही दर्शने होत :**

वेद वाङमय शिकण्यासाठी केवळ गुरुवर वा ग्रंथांवर आंधळा विश्वास असून चालणार नाही. शिष्याच्या ठिकाणी, सत्य शोधून काढणे व ते पडताळून पाहाणे या संबंधी सर्वतोपरी जिज्ञासा व चिकाटी हवी. तर्काची मर्यादा संपेपर्यंत त्याचा पाठपुरावा करण्याची बुद्धीची तयारी हवी. सरतेशेवटी अंतिम सत्याचा अनुभव हा प्रत्यक्ष आणि तात्कालिक आंतरिक स्फुरणातून येऊ शकेल. उपनिषद रचणाऱ्या ऋषींनी बुद्धीने जितका काही शोध घेता येईल तेवढा सारा शोध घेतला आणि बुद्धी कुंठित झाली व काही करता येण्यासारखे नाही असे आढळले तिथे ते शरण गेले. त्यासाठी त्यानी वादाची रणे माजविली नाहीत. ते आदराने नम्र झाले. त्यांना जो काही अनुभव आला, जे काही प्रत्यक्ष दर्शन घेणे शक्य झाले ते त्यांनी पाहिले. या मुळेच या तत्त्वज्ञान ग्रंथांना दर्शने असेही म्हणतात.

**शिष्याची गुणवत्ता :**

आत्मविद्या ही सर्व श्रेष्ठ प्रकारची विद्या असल्याने ती प्राप्त करून घेणारा शिष्यही तितक्याच विशेष गुणांनी युक्त असला पाहिजे. त्याला वेदाची, वेदांगांची चांगली माहिती असावयास हवी. अगर त्याने ती माहिती प्रथम करून घ्यावयास हवी. नारदाने सनत् कुमार याजकडून ही विद्या प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी सनत् कुमाराने नारदाचे अध्ययन किती झाले आहे याची प्रथम चौकशी केली. ही विद्या घेण्यापूर्वी घेणाऱ्याचे अंत:करण अत्यंत पवित्र असावयास हवे. सत् आणि असत् याचा बोध होण्याइतपत बुद्धीची क्षमता असावयास हवी. तसेच आंतरिक शांतता, इंद्रिय संयम, अत्यंत आवश्यक, आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे संसार बंधनातून सुटका व्हावी अशी तीव्र तळमळ असावयास हवी. अशा गुणांनी युक्त असलेला शिष्य उपनिषद् विद्येला पात्र मानला जात असे.

**शिष्य परीक्षा :**

शिष्य विद्या ग्रहण करण्यासाठी आला असता गुरू त्याला लागलीच विद्या देत नसे. तो त्याची कसून परीक्षा घेत असे. कठोपनिषदात कथा आली आहे. नचिकेत यमाकडून ब्रह्मविद्या शिकू पाहात होता. यमाने नचिकेताची कसून परीक्षा घेतली आहे. इंद्राने प्रतर्दनाची परीक्षा घेतली आहे (कौषीतकी उप.) जानुश्रुती पौरायण याची रैक्वाने परीक्षा घेतली आहे (छांदोग्य उप.) प्रवाहण याने आरुणीची परीक्षा घेतली आहे (बृह. आरण्यक) बृहद्स्थाची परीक्षा शाक्यायनाने घेतली आहे (मैत्रायणी उप.) प्रश्नोपनिषदात पिप्पलादाने आपल्याकडे आलेल्या सहाही शिष्यांची परीक्षा घेतली आहे. प्रजापतीने इंद्राला व विरोचनाला बत्तीस वर्षे तपश्चर्या करावयास सांगितले. विरोचन थांबला. इंद्राने प्रजापतीच्या सांगण्यावरून आणखी त्र्याहत्तर वर्षेपर्यंत तपश्चर्या केली व त्याजकडून इंद्राने ब्रह्मविद्या प्राप्त करून घेतली (छांदोग्य उप.) यावरून ही विद्या कोणालाही सुखासुखी मिळत नसे, असे सिद्ध होत आहे. यासाठी शिष्याला परीक्षेच्या अग्निदिव्यातून जावे लागे. शिष्य ही विद्या घेण्यास योग्य आहे की नाही

जीवनातील काही पराभव मिळालेल्या विजयापेक्षा मोठे असतात.

याची कसोटी प्रथम पाहिली जात असे. मगच गुरू विद्या देत असे. विद्या योग्य माणसालाच दिली जावी व त्याची शुद्धता राखली जावी हे ऋषींना अभिप्रेत होते.

**सत्य कथन करणारे ऋषी :**

धार्मिक ग्रंथांची श्रेष्ठता त्यांच्या गुणाधिष्ठित शिकवणुकीवर अवलंबून असते. ईश्वर, विश्व, मानव आणि मुक्ती या चार महत्त्वाच्या गोष्टींबद्दल ग्रंथात कोणता विचार मांडला आहे त्यावर धर्म प्रतिष्ठित होत असतो. उपनिषदात या चारही गोष्टींविषयी साकल्याने विचार झालेला आहे. इतकेच नव्हे वैदिक काळापासून चालत आलेल्या उत्तमोत्तम गोष्टी सुधारून आणि ती प्रभावी करण्याची व्यापक दृष्टीही इथे आढळते. या ऋषी मंडळींसंबंधी बोलताना एकदा रामकृष्ण म्हणाले – उपनिषदातले ऋषी सत्य कथन करणारे आहेत. वाराणसी पाहिली आणि तिथे जातीने राहिले त्यांचे हे कथन आहे. केवळ नकाशावरून त्या नगरीचा बोध घेऊन त्याबद्दल मत व्यक्त करणारे हे नव्हते. ''यांना ईश्वर म्हणजे केवळ एक परंपरेने आलेला विचार असे कधी वाटले नाही. ते ईश्वराला सर्वत्र पाहात असत. तो खाली आहे, वर आहे, समोर आहे, दक्षिणेकडे आहे, उत्तरेकडे आहे आणि खरोखर सर्वत्र आहे. त्याच्या भीतीने अग्नि प्रज्वलित होतो. सूर्य प्रकाशतो. इंद्र, वायू आणि यम आदी गतिमान आहेत.'' भयात् अस्य अग्निः तपति। भयात् तपति सूर्यः। भयात् इंद्रश्च वायुश्च मृत्युःधावति पंचमः (कठ उप. २.६.२) असे गार्गी त्या अक्षराच्या आज्ञेने सूर्यचंद्र हे वेगळेपणाने राहातात. त्याच्याच आज्ञेने स्वर्ग आणि पृथ्वी अलग झाले आहेत. क्षण, घटिका, दिवस, रात्र, षण्मास, संवत्सर ही सारी अलग झालेली आहेत.'' एतस्य अक्षरस्य प्रशासने गार्गि द्यावा पृथिव्यौ विधृते तिष्ठतः। एतस्य वा अक्षरस्य प्रशासने गार्गि निमेषा, मुहूर्ता, अहोरात्राणि, अर्थमासा, ऋतवः संवत्सराः इति विधृताः निष्ठन्ति। (बृ. आ. ८-९)

**क्षत्रियांचे वर्चस्व :**

काही लोकांचा विशेषतः पाश्चात्यांचा असा समज झाला आहे की वेदांतील कर्मकांडावर उतारा म्हणून उपनिषदे ग्रथित करण्यात आली असावीत. हा समज बरोबर नाही. वैदिक धर्मात कोणत्याही भागाची मोडतोड करणे बसत नाही. कदाचित त्यातच वेदाची श्रेष्ठता दडली असेल. वास्तविक ऋषींनी तत्कालीन समाजातील विचारांचा परामर्ष घेऊन जे काही अंतिम सत्य आहे, त्यांच्या त्यावेळी असलेल्या कल्पना, श्रद्धा, आचरण, यांची सांगड घालून उपनिषद् द्वारे मार्गदर्शन केले. या बद्दल त्यांच्या स्वतंत्र प्रज्ञेची सर्व समावेशकतेची आणखी धाष्टर्याची प्रशंसा करणे योग्य ठरेल. द्रव्य यज्ञाचे रूपांतर करून त्याचे उदात्तीकरण केले. त्याला ज्ञानाचे अधिष्ठान प्राप्त करून दिले. याचे वर्णन गीतेत आलेले आहे. 'द्रव्ययज्ञा स्तपो यज्ञाः योगयज्ञा स्तथापरे। स्वाध्यायज्ञान यज्ञाश्च यतयः संशित व्रताः। गीता ४.२८ एवं बहुविधा यज्ञा वितता ब्रह्मणो मुखे। गीता ४-३२ आणि हे करत असताना यज्ञ कल्पनेला यत्किंचितही धक्का न लावता अगर पूर्वापार पद्धत उखडून न टाकता हा बदल घडवून आणला आहे. यात ते यशस्वी झाले. इतकेच नव्हे दूरवर अति पूर्वेकडच्या देशांतही ही त्यांची शिकवण पसरली. अशाप्रकारे ही श्रेष्ठ उदात्तताच धर्माचे पायाभूत अंग ठरले. संघर्ष नव्हे. समन्वय हीच ती उदात्त शिकवण. ब्राह्मण केवळ यज्ञायागादी क्रियेत व्यग्र होते. आत्मतत्त्वाच्या ज्ञानाकडे त्यांचे विशेष लक्ष नव्हते. म्हणून क्षत्रियांकडून त्याना हे ज्ञान प्राप्त करून घ्यावे लागले, याचा अर्थ क्षत्रियांचे वर्चस्व निर्माण झाले असे म्हणणे अयोग्य ठरेल. ज्ञानाची मक्तेदारी कुणा एका व्यक्तीची वा वर्णाची अगर एखाद्या देशाची असू शकत नाही. हे समजून घेतल्यास हा गैरसमज नाहीसा होईल.

**वेदातील विद्या :**

विद्या याचा अर्थ सत्याचे ज्ञान. सर्वसाधारण ज्ञानाहून वेगळ्या प्रकारचे ज्ञान. सर्वसाधारण ज्ञान म्हणजे बुद्धीचा केवळ विलास होय. बाह्य पसाऱ्याचे ज्ञान. विद्या ही आंतरिक, इंद्रियातीत, आणि अनुभवाचे ज्ञान होय. मुंडक उपनिषदात या विषयी विचार करताना विद्येचे दोन प्रकार सांगितले आहेत. परा आणि अपरा. अपरा विद्येत चार वेद, विश्वविषयक विचार सारी भौतिक शास्त्रे इत्यादी प्रामुख्याने समाविष्ट झालेली आहेत. याला ऋषींनी आपली पूर्ण संमती दर्शविलेली आहे. कारण मानवाच्या भौतिक विषयक या गोष्टी आहेत. हे त्यांना ठाऊक होते. मात्र त्यांनी इतकेच सांगितले की ह्या गोष्टी शाश्वत स्वरूपाच्या नाहीत. परा म्हणजे शाश्वत वस्तूचे ज्ञान. यालाच ब्रह्मज्ञान असेही म्हणतात. हीच ती ब्रह्मविद्या. हेच उपनिषदातले ज्ञान. हे ज्ञान इतर सर्व ज्ञानांचे माहेरघर आहे. यावर इतर सारे ज्ञान प्रतिष्ठित झाले आहे. याला सर्व विद्या प्रतिष्ठा म्हटले गेले आहे. या ज्ञानाची जपणूक ऋषींनी कसोशीने केली आहे. हे ज्ञान त्याना संपत्ती युक्त पृथ्वीपेक्षाही अतिशय श्रेष्ठ वाटत होते. हे ज्ञान त्यांनी योग्य व्यक्तींनाच दिले. जे सत्यान्वेषी आहेत. परमहंस पदाला पोचण्याची ज्याची इच्छा आहे, त्यांनाच ही ब्रह्मविद्या पूर्णत्वाने आकलन होईल. कारण ब्रह्म इंद्रियानी अगर केवळ विचाराने जाणता येण्यासारखी गोष्ट नाही. या गोष्टीच ब्रह्मावर अवलंबून आहेत. फक्त योगद्वारे मानवाला ही अती गंभीर सूक्ष्म वस्तू ध्यानात येऊ शकेल. त्यानंतरच अतिंद्रिय सत्याचे आकलन होऊ शकेल. ऋषी या योगात निष्णात होते. त्यांच्या मनाची व हृदयाची कवाडे उघडी होती. त्यामुळे त्यांना उत्पत्तीची रहस्ये कळू शकली व विश्वाचे स्वरूप ध्यानात येऊ शकले.

ब्रह्म विद्येच्या साधकाने आपली इंद्रिये व मन यांच्या संयमाने ही सूक्ष्म शक्ती मिळविण्याचा प्रयत्न केला व अशा प्रकारे ज्ञानप्राप्तीचे एक नवीन दालन उघडले. यालाच बोधी म्हणजे जाण म्हणतात. उपजत प्रवृत्ती तर्क युक्त विचार आणि अंतरिक ज्ञान, असे ज्ञान प्राप्तीचे तीन प्रकार संभवतात. हे तीनही प्रकार म्हणजे मनाचेच वेगळे स्तर होत. म्हणूनच निम्न स्तरावरील ज्ञान उच्च प्रकारच्या ज्ञानात परिणत करता येणे शक्तय होते. यासाठी लागणारी साधने बाह्य विविध उपकरणे नसून मन:संयमनाने आंतरिक शुद्धी हाच एकमेव मार्ग आहे. उपनिषदाची शिकवण नेहमीच मौखिक स्वरूपाची नसे. बरेच बेळा शिष्यांना गुरु चिंतन करण्यास भाग पाडी व त्याचे उत्तर त्यानाच शोधावयास लावी. तैत्तिरीय उपनिषदात वरुण व भृगु यांची कथा आली आहे. भृगु आपला पिता वरुण याजकडे गेला व म्हणाला, मला ब्रह्मविद्या शिकवा कारण ते अंतिम सत्य आहे. पित्याने त्याला ब्रह्मासंबंधी ठळक गोष्टी सांगितल्या. ब्रह्मापासूनच सारी सृष्टी प्राण्यासह निर्माण झाली आहे. त्यावरच ती सारी प्रतिष्ठित आहेत. त्यातच पुन: प्रवेश करतात म्हणजे निधनानंतर त्याच तत्त्वात विलीन होतात. तू आता हे तत्त्व काय आहे याचा शोध घे. भृगु अरण्यात गेला आणि त्याने चिंतन केले. चिंतनातून तो एका निर्णयाप्रत आला. अन्न म्हणजे सृष्ट पदार्थ हीच मूळ वस्तू असावी. आणि तेच ब्रह्म होय. अन्नापासून सर्वांची उत्पत्ती होते. अन्नानेच जीवनाची धारणा होते व शेवटी अन्नातच विलयन होते.

असे जाणल्यावर तो आपल्या वडिलांकडे आला आणि त्यांना ही गोष्ट सांगितली, त्यांनी त्याचे म्हणणे शांतपणे ऐकून घेतले. व पुन:शोध घे असे सांगून परत पाठविले. तो पुन: चिंतनासाठी गेला. अन्नापेक्षाही प्राण श्रेष्ठ असल्याचे त्याच्या ध्यानात आले. तेच ब्रह्म असावे असे त्याला वाटले. तो वडिलांकडे आला व आपला निर्णय सांगितला. वडिलानी शांतपणे ऐकून घेतले व पुन:शोध घेण्यासाठी परत पाठविले. अशा प्रकारे चिंतन करता करता मन, विज्ञान आणि सरते शेवटी आनंद म्हणजे ब्रह्म याचा त्याला उलगडा झाला. स्वत:चाच शोध

घेण्याची आवश्यकता आहे हेच उपनिषदात प्रतिपादले आहे. कारण आत्मज्ञान हे अनुभवाचे ज्ञान आहे.

**उपनिषदातील विचार :**

इंद्रियांनी आकलन न करता येणारी, सत्यज्ञानाची शिकवण उपनिषदात आहे. जीव, जगत् आणि जगदीश, प्रकृती, सगुण ब्रह्म याचेही वर्णन उपनिषदात आढळते. याची सत्यता आणि व्यक्तता, त्यांच्या शक्ती आणि त्यांचे प्रकार या सर्वांचा खोलवर विचार केलेला आहे. उत्पत्ति, स्थिति आणि प्रलय. या विश्वाच्या संदर्भातल्या कल्पना तसेच सतत घडणारे बदल, त्याचे परिणाम हेही उपनिषदात सांगितले आहेत. जीवाच्या उन्नतीसाठी विचार करण्यात आलेला आहे. जीवाची उत्क्रांती, त्याचे अंतिम स्थान, त्याची बद्धता आणि मुक्तता, तसेच जड आणि चेतन यांतील परस्पर संबंध, ईश्वर आणि विश्व, जीव आणि ईश्वर यांचे संबंध इत्यादी गोष्टीचे विवेचन उपनिषदात केले आहे. वरील साऱ्या गोष्टी दैनंदिन व्यावहारिक स्वरूपाच्या नाहीत. तरी देखील मानवाचे हित वा अहित हे या गोष्टींच्या ज्ञानावर अवलंबून असल्याने यांचा विचार आवश्यक आहे. कारण मानव दिसतो त्याहीपेक्षा तो जास्त इंद्रियातीत आहे. पाण्यावरील बर्फ दिसतो त्याहीपेक्षा त्याचा बराच भाग पाण्याखाली असतो. त्याचप्रमाणे हे मानवाचे दिसणे असते. जाणिवेच्या स्तराहून भिन्न असलेले म्हणजे तर्कापलीकडे असलेले होय. मानवापुढील नाजूक प्रश्न सोडविण्यास सामान्यज्ञान तोकडे पडते म्हणून मानव ज्ञानाचे दुसरे दालन उघडतो. कारण त्याच्या पुढील प्रश्नांची गंभीरता व्यापक असते. मृत्यूनंतर आत्म्याचे काय होते? तो असतो का नसतो? जर असेल तर पुन: तो पृथ्वीवर कसा परत येतो? चांगल्या व वाईट कृत्याला माणूस जबाबदार आहे का? मानवी जीवनाचे अंतिम ध्येय काय?

वरील प्रश्नांच्या उत्तरावर आपले कर्म, स्वभाव इत्यादी अवलंबून आहेत. तरी देखील केवळ इंद्रियांनी साहयभूत असलेल्या बुद्धीने म्हणजे तर्काने याचे उत्तर आपण देऊ शकत नाही. देव आहे का? तो सगुण आहे का निर्गुण आहे? तो विश्वातीत आहे का विश्वमय आहे? का दोन्ही आहे? विश्व सत्य का असत्य? विश्व मानवी मनाच्या अतीत आहे का मानवी कल्पनेचे आहे? विश्व अनादि आहे की विश्वाचा आरंभ झाला आहे? ईश्वरच विश्व झाला आहे का त्याने निर्माण केले आहे? विश्व हे असत्य नसेल तर ते सत्य आहे का अनंत आहे?

अशा प्रकारचे मानवाचे मन चौकस असल्याने त्याला योग्य प्रकारचे उत्तर हवे असते. परंतु या प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी मानवाकडे काही बाह्य उपकरणे नाहीत. फक्त ब्रह्मज्ञानानेच या सर्व संशयात्मक प्रश्नांची उत्तरे मिळू शकतील. त्यानंतरच हृदयबंध तुटतील आणि संशयाचे पूर्ण निवारण होईल. हा वैदिक दृष्टिकोन आहे. तेच हिंदू लोकांचे तत्त्वज्ञान म्हणून आज प्रसिद्ध आहे. हिंदू धर्म हा वैदिक धर्मच आहे. परेश्वराने स्वत:हून ऋषींच्या माध्यमातून हे ज्ञान प्रसारित केले आहे. अशी भारतीयांची धारणा आहे. मानव अंतर्मुख होऊन किती खोलवर विचार करू लागला त्या प्रमाणात त्याचे अंत:करण शुद्ध होत गेले आणि जाणिवेच्या म्हणजेच ज्ञानाच्या कक्षा रुंदावल्या. वेद आणि उपनिषदातील ज्ञान अशा प्रकारचे आहे. ब्रह्मज्ञान हे अखिल मानवासाठी आहे. ही विद्या सार्वकालीन आणि सार्वदेशिक आहे. हेच अंतिम सत्य सर्व वैश्विक धर्माचे पायाभूत तत्त्व बनले आहे.

(क्रमश:)

**श्री. शं. बा. मठ**
६, कुमार आशिष, राम मारुती रोड,
वंदना बस स्थानकाजवळ,
ठाणे – ४०० ६०२.
दूरध्वनी : २५३५२०३०

●●●

# गृहस्वामिनी

*स्त्री ही फक्त पत्नी नसते, तर अनेक नाती संभाळणारी स्वामिनी असते. तिचे घरातील स्थान महत्त्वाचे असते. तिचे स्थान तिला द्यायलाच हवे – संपादक*

स्त्री ही क्षणाची पत्नी असून अनंत काळाची माता असते असे म्हटले जाते. कारण प्रत्येक यशस्वी पुरुषाच्या मागे तिचे कार्य महत्त्वाचे असते. घरातील प्रत्येकाचा ती आधारस्तंभ असते. प्रत्येकाच्या अडचणीत ती मदत करीत असते. लहान मुलांच्या अभ्यासात, खेळण्यात, खाण्यापिण्यात आणि त्यांच्यावर संस्कार करण्यात तिचा मोठा सहभाग असतो. कोणत्याही क्षणी दुसऱ्यांना समजून घेण्याची, त्यांना मदत करण्याची क्षमता, तसेच इच्छा तिच्यात दिसून येते. पतीच्या सुखदु:खात तिने दिलेली साथ महत्त्वाची असते, तिचे प्रोत्साहन महत्त्वाचे असते. तिच्या सहकार्यातून तसेच प्रोत्साहनातूनच पती आपल्या प्रगतीच्या वाटेवर सुखरूप व आनंदी प्रवास करीत असतो आणि आयुष्यातील ठरवलेले ध्येय पूर्ण करू शकतो.

अशा स्त्रीकडे घरातील प्रत्येक सभासदानेही याच भावनेने पाहिले पाहिजे. तिच्या मनाचा विचार करायला हवा. तिलाही मन, भावना असतात हे लक्षात घ्यावे. पतीने किंवा इतरांनी ती घरातील काम करणारे एक यंत्र समजू नये. तिला मोलकरीण समजून वागणूक देऊ नये. प्रत्येक वेळी तिच्या भावना दुखावल्या, तिच्यावर अन्याय होत राहिला किंवा छळ होत राहिला तर आपल्या घरातील सुख, शांती, समाधान नाहीसे होऊन कधी आपल्या पदरी दु:ख, निराशा आणि बरबादी येईल हे समजणारही नाही. म्हणून प्रत्येक पुरुषाने स्त्रीकडे पहाण्याचा दृष्टिकोन बदलला पाहिजे. पत्नी या नात्याबरोबरच आपणासोबत आई, बहीण, मावशी इ. नाती जोपासण्याचे कामही ती पार पाडीत असते. आपल्या आईच्या नंतर तीच आपला प्रेमळ हात पाठीवरून फिरवत असते. बहीण नसेल त्यावेळी बहिणीचे प्रेमही ती देत असते. थोडक्यात काय तर एक ठरावीक वेळ सोडली तर ती आपल्यावर इतर सर्व नात्यांचा अधिकार गाजवत असते. म्हणून तर स्त्री ही क्षणाची पत्नी असून ती अनंत काळाची माता असते असे म्हणतात. या ठिकाणी पत्नीनेही एक गोष्ट लक्षात ठेवावी की, आपण आपल्या रक्ताची सर्व नाती सोडून सासरी आलेले असतो, त्यामुळे सासू-सासरे हेच आपले आई-वडील आहेत, दीर आणि नणंद आपले भाऊ आणि बहीण आहेत, तसेच पती हाच परमेश्वर समजून वागले पाहिजे. पतीचा योग्य तो मान सांभाळावा. पतीचा योग्य तो मान सांभाळला जावा म्हणून तर लग्नप्रसंगी पत्नीचे वय पतीपेक्षा कमी ठेवण्याची परंपरा आहे, याची आठवण ठेवावी.

आज अनेक पालक आपल्या मुलाचे लग्न करण्याआगोदरच भावी सुनेबद्दल वेगवेगळ्या अपेक्षा ठेवून असतात. आमची सून लाखात एक असावी, तिने हे केले पाहिजे, तिने ते केले पाहिजे, ती सर्वांचा आदर राखणारी असावी वगैरे वगैरे. अशा अनेक प्रकारच्या कल्पना मनात ठेवून आपल्या भावी सुनेबद्दल एक चित्र (Image) मनात उभे करीत असतात. आणि नेमकी या ठिकाणीच आपण आपल्या आयुष्यात मोठी चूक करीत असतो. कारण या सर्व गोष्टींचा विचार करीत असताना आपण तिच्यामध्ये जे काही चांगले-वाईट गुणधर्म असतील, त्यांचा कधी विचारच करीत नाही. तिच्या एकंदर वागणुकीचा काही अंदाजही आपणास नसतो. लग्न झाल्यानंतर जर सून आपल्या मनाप्रमाणे वागली नाही किंवा तिच्याकडून

लहान-लहान चुका झाल्या तरीही घरात वाद विवाद सुरु होतात. कारण आपली सून कशी असावी किंवा कशी असू नये हे आपण लग्नापूर्वीच ठरवलेले असते. पण घरात येणाऱ्या सुनेला याची कल्पनाही नसते. मग तिच्याबद्दल आपल्या मनात एक चित्र (Image) निर्माण करणे किती योग्य आहे? सून म्हणून प्रत्यक्ष स्वीकार केल्यानंतरच तिच्यातील गुणदोष पाहून योग्य त्या माफक अपेक्षा ठेवाव्यात. सर्वात प्रथम सासू-सासरे यांनी तिला आपल्या मुलीप्रमाणे वागणूक दिली पाहिजे. ती घरातील लक्ष्मी समजून तिचा आदर केला पाहिजे. तिला प्रेमाने वागवले पाहिजे. आपला मुलगा आपल्या ताब्यात रहावा म्हणून प्रयत्न करू नका पण सुनेला प्रेमळ शब्दाने, प्रेमळ भावनेने जिंका. जर एकदा का तुम्ही तुमच्या सुनेला जिंकलेत, तिला विश्वासात घेतलेत तर तुमचा मुलगा तुमच्यापासून केव्हाही दूर जाणार नाही हे लक्षात घ्या.

कार्यालयात नोकर भरती करतानाही अशाच प्रकारचा दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेवून निवड करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांकडून अमूक प्रकारचे काम केले पाहिजे, त्यांनी अशा प्रकारे वागले पाहिजे इ. पण प्रत्यक्षात त्याची निवड झाल्यानंतर कळते की, त्याच्या आवडी-निवडी आपल्यापेक्षा वेगळ्या आहेत. त्याच्या कामाची पद्धत वेगळी आहे आणि मग त्याच्याकडून लहान-लहान चुका झाल्या तरीही वाद विवाद होतात.

घरामधील नणंद, दीर इ. नीही काही पथ्ये पाळायला हवीत. आपण केवळ चार दिवसाचे पाहुणे आहोत असे समजून वागले पाहिजे. आपल्या आई-वडिलांचा आणि भावाचा तीच सांभाळ करणार आहे. सर्व काही तिच्याच हाती असते. त्यामुळे तिच्या छोट्या-छोट्या चुका लक्षात घेऊन घरात वाद निर्माण होणार नाहीत याची काळजी घ्यावी. तिच्याकडून झालेल्या चुकांबद्दल भावाजवळ किंवा आई-वडिलांच्या कानात तिला चोरून हळूच बोलू नये. असे केल्याने घरातील वातावरण बिघडण्यास वेळ लागत नाही. म्हणून तिच्या चांगल्या कामाचे कौतुक करा, स्तुती करा जेणेकरून तुमच्याबद्दल तिच्या मनात आदराची भावना निर्माण होईल. तिच्याकडून काही चुका झाल्या असतील तर प्रेमाने तिच्या लक्षात आणून द्या. त्या चुका सुधारण्याची संधी तिला द्या. आपण सर्वांनी एक गोष्ट लक्षात घ्यायला हवी ती म्हणजे दुसऱ्या व्यक्तीमध्ये बदल घडवून आणायचा असेल तर प्रथम आपण स्वत: बदलले पाहिजे. तरच समोरच्या व्यक्तीमध्ये झालेला बदल आपणास दिसून येतो. स्त्री असो किंवा पुरुष कोणालाही आपली झालेली निंदा किंवा अपमान आवडत नाही; पण केलेली स्तुती मात्र आवडते. म्हणून झालेल्या चुकांकडे दुर्लक्ष करून चांगल्या कामाची स्तुती करा. कारण आपल्या घराचा स्वर्ग करायचा की नरक हे सर्वस्वी तिच्याच हाती असते.

**श्री. यशवंत माने**
अबोली, बी - १०३,
सुभाष रोड, कुंभारखान पाडा,
डोंबिवली (प.), जि. ठाणे

●●●

कॉलेजला जायचं तर मोबाईल, सॅक, बाईक, शूज, ब्रॅण्डेड शर्टस् हा सारा जामानिमा हवाच असा जणू अलिखित नियमच बनला आहे. ज्यांच्याकडे या वस्तू नाहीत ते इतरांच्या दृष्टीने बावळट ठरतात. येता जाता त्यांना हिणवलं जातं. या साऱ्याचा परिणाम त्यांच्या शैक्षणिक जीवनावरही झाल्यावाचून राहत नाही. आधुनिक सुविधांचा लाभ घेण्यात गैर काहीच नाही पण, कॉलेजविश्वात महत्त्व कशाला द्यायचं हे ठरवता यायला हवं.

– संग्रहातून

# 'संगीत शिक्षकांची भूमिका आणि नव्या शिक्षण प्रणालीची आवश्यकता'

*शालेय शिक्षणातील संगीत शिक्षणाचे महत्त्व स्पष्ट करणारा हा लेख - संपादक*

माझी संगीतातील अतिशय आवड बघून माझ्या आईवडिलांनी लहानपणापासून मला संगीताची तालीम द्यायला सुरुवात केली. गुरुशिष्यप्रणाली नुसार रीतसर मी संगीताचे शिक्षण घेत आसताना संगीतातच पुढे करिअर करायचे ठरवले आणि त्याप्रमाणे नागपूर विद्यापीठातून मी संगीतात एम.ए.ची पदवी प्रथम श्रेणीत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण केली. गांधर्व महाविद्यालयाची संगीत विशारद प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आणि बी.एड. सुद्धा दहाव्या क्रमांकाने मेरीटमध्ये उत्तीर्ण झाले.

लगेचच मला महाविद्यालयात शिकविण्याची संधी मिळाली. काही वर्षे प्राध्यापिका म्हणून मी काम केलं. तेव्हा महाविद्यालयीन स्तरावर शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अडचणी लक्षात आल्या. शालेय स्तरावर हा अनुभव मिळावा म्हणून मी शाळेत संगीत शिक्षिका म्हणून काम केले. शिक्षिका आणि प्राध्यापिका म्हणून अध्यापनाचे कार्य करत असताना मुलांना येणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन संगीत शिक्षणासाठी नव्या अध्यापन शैलीचा विचार होणे किती आवश्यक आहे, याचा विचार सुरू झाला आणि या दिशेने मी जो विचार केला तो मी आपणासमोर मांडते आहे.

संगीत हा विषय नव्या अध्यापन पद्धतीने, विविध उपक्रमांमार्फत, शाळा आणि महाविद्यालयांमधून कसा शिकविला जावा याविषयक विचार काही संगीत परिषदांमधून मी संगीत शिक्षकांसमोर, संगीत तज्ज्ञासमोर मांडले. त्यामध्ये मला उत्तम प्रतिसाद मिळाला. आता महाराष्ट्र बालशिक्षण परिषदेतून आपणांसारख्या सुज्ञ, तज्ज्ञ मंडळींसमोर माझे विचार मांडायची सुवर्ण संधी मला मिळाली.

अध्यापन हा व्यवसाय आहे आणि प्रत्येक व्यवसायाला स्वत:ची अंगभूत व्यवसायनीती असतेच. एक डॉक्टर चुकला तर फक्त एक रोगी दगावतो परंतु एक शिक्षक चुकला तर संपूर्ण एक पिढी नष्ट होण्याचा धोका असतो. म्हणूनच, प्रत्येक शिक्षकाची फार मोठी जबाबदारी असते. कोणतेही कलाशिक्षण हे अध्यापनात एक आनंद निर्माण करते, औसुक्त्य टिकवून धरते. संगीताची अभिरुची मुलांमध्ये सहज निर्माण व्हावी, क्लिष्ट भाग देखील मुलांना सहज समजावा आणि तालमीचे तंत्र लवकर अवगत व्हावे. सहज, सुलभ, हसतखेळत, नैसर्गिकरीत्या संगीताचे शास्त्र आणि क्रियात्मक दोन्हींचे एकत्रित शिक्षण कसे देता येईल, याचा विचार संगीत शिक्षकांनी करणे आवश्यक आहे. या प्रवासात पालक, बालक-शिक्षक हे तीन घटक महत्त्वाचे आहे.

विश्वविख्यात नृत्यांगना ईझोडोरा डंकन हिला एकदा कुणीतरी विचारले तुम्ही नृत्याला कधी प्रारंभ केला? तेव्हा तिने उत्तर दिले, मी आईच्या गर्भात होते तेव्हापासूनच. महान संगीतकार स्वामी हरिदासांना कुणी प्रश्न केला, संगीतावर सर्वात जास्त प्रेम करणारा कोण? स्वामी हरिदास म्हणाले, 'बालक'. तात्पर्य असे की, संगीत किंवा अन्य कलेसंबंधीचे संस्कार लहान मुलांमध्ये जन्मापासूनच असतात. हे सुप्त गुण ओळखून योग्य दिशेने त्यांना मार्गदर्शन देण्याची गरज असते.

संगीत हे मानव समाजासाठी एक वरदान आहे. आनंदासोबतच ज्ञान आणि अनुभव देणारी ही कला आहे. ललित कलांचे शिक्षण घेण्यासाठी 'बाल्यकाळ' हा सर्वोत्तम काल मानला जातो. कारण या वयात लहान मुलांची ग्रहणशक्ती अधिक प्रबळ असते. आणि म्हणूनच शाळांमधून, प्राथमिक शाळांपासूनच संगीत विषय शिकवला जावा असे महात्मा गांधींनी म्हटलं आहे.

प्रत्येक मूल निर्मितिक्षम असते हे एकदा मान्य केले तर आम्हां मोठ्यांची जबाबदारी असते की, विविध ज्ञान सामग्री त्यांना पुरवणे. मुलांचे स्वतंत्र असे एक व्यक्तिमत्त्व असते. त्या व्यक्तिमत्त्वाला ओळखून त्यांच्या रुचीनुसार त्यांना अनुकूल शिक्षण दिले गेले तर, त्यांची आंतरिक शक्ती विकसित होण्याची संधी मिळते. हे ओळखून त्यांना तसे शिक्षण देण्याची जबाबदारी पालक आणि शिक्षकांची असते.

मुलांना संगीत मुळातच आवडते. मग अभिजात संगीत लवचीकपणे, आधुनिक पद्धतीने, मुलांपर्यंत का पोहचवू नये? संगीताचा संबंध जन्मापासूनच असतो. लहानपणी विलक्षण संगीताची प्रतिभा असणाऱ्या बालकलाकारांची प्रतिभा पुढे संकुचित का होते? काही मुलांमध्ये संगीताविषयी प्रथमच भीती निर्माण झाल्यामुळे त्यांनी पुढे संगीत शिक्षणाला रामराम ठोकला, तर काही ठिकाणी संगीताचे योग्य शिक्षण न मिळाल्याने बालप्रतिभा संकुचित झाली, अशी उदाहरणे पहायला मिळतात. खरे तर संगीत विषयाचा मूळ उद्देशच 'आनंद निर्मिती' हा आहे. संगीतामुळे आनंद मिळावा, गोडी वाटावी व संगीत अध्यापनातील मुलांची अभिरुची वाढावी असा संगीताचा अभ्यासक्रम आखणे आज आवश्यक झाले आहे. शाळांमधून संगीत हा विषय शिकवला जात असल्यामुळे/ प्रत्येक विद्यार्थ्यात स्वतंत्र अभिव्यक्ती फुलविण्याची जोपासण्याची निकोप संधी पालकांना आणि शिक्षकांना सहजच मिळाली आहे.

आजपर्यंत संगीतात 'सामवेद', 'भरताचे नाट्यशास्त्र', 'संगीतदर्पण' हे ग्रंथ मोठ्यांनी मोठ्यांसाठीच लिहिले. लहान मुलांसाठी नाही. आज जगातील सर्व विकसित देशांमध्ये, बालशिक्षणात संगीताचे महत्त्व स्वीकारले गेले आहे. व संगीताला महत्त्वपूर्ण स्थान दिले आहे.

संगीत कलेचे शिक्षण गुरुशिष्य प्रणालीत दिले जात असले तरी, शाळेत संगीत विषयाचे शिक्षण देताना त्या विषयाला शाळेत मिळणाऱ्या तासिका-वेळ, मुलांचे वय-वर्ग या सर्व बाबींचा विचार करून संगीत शिक्षणासाठी आधुनिक पद्धतीचा, नव्या शिक्षण प्रणालीचा विचार, संगीत शिक्षकांनी करणे गरजेचे झाले आहे.

जुन्या अनुभवावरून नवीन विचार, नवे बदल, नवी अध्यापन शैली स्वीकारून शिक्षण क्षेत्रातील रटाळपणा, मरगळ घालवून नवे उत्साही, आनंदी हसतखेळत शिक्षण देणे, शाळेतील इतर विषयांशी, कलाविषयांशी संगीताचा परस्पर संबंध साधून त्याप्रमाणे शिक्षण देणे, स्वत:च्या ज्ञानकक्षा वाढवून कल्पकतेने सहजगत्या विद्यार्थ्यांची प्रगती साधण्याकडे आम्हां शिक्षकांचे लक्ष केंद्रित होणे आवश्यक आहे.

आज जगात सर्वत्र ज्ञानाच्या कक्षा रुंदावत आहेत. नवनवे उपक्रम योजून कलाशिक्षकांनी ज्ञानसमृद्ध होणे हे म्हणूनच अतिशय आवश्यक आहे. आजच्या धावपळीच्या स्पर्धात्मक युगात, प्रत्येक विद्यार्थी आणि त्यासोबत त्यांचे पालक सुद्धा भांबावलेले आहेत. विद्यार्थ्यांना प्रत्येक विषयाचे सखोल ज्ञान आणि समृद्ध ज्ञान होणे ही आजची गरज आहे. शिक्षणाचा दर्जा वाढवणे हे ओघाने आलेच. आम्ही सर्वांनी या दृष्टीने स्वत:ला घडविणे, विकसित करणे, कार्यरत करणे अतिशय आवश्यक आहे. जुन्या अनुभवांवरून नवीन वैचारिक देवाणघेवाण होणे आवश्यक आहे. त्यासाठी एकाच

विचाराच्या एकाच ध्येयाने प्रेरित होऊन नवनवीन उपक्रम, नवीन योजना राबविणाऱ्या, एकाच दिशेने वाटचाल करणाऱ्या मंडळींची भेटगाठ होऊन त्यातून वैचारिक देवाणघेवाण होणे आज नितांत गरजेचे आहे. संगीताच्या अध्यापनात आनंद, उत्साह निर्माण होतो. हा आनंदच अध्यापनातील उत्सुकता टिकवून धरतो. आपल्या अध्यापनात अधिकाधिक नावीन्य, जिवंतपणा राखण्यासाठी अध्यापनविषयक, युक्त्या-प्रयुक्तांचा अभ्यास करणे, शिक्षकांना आवश्यक आहे.

संगीत शिक्षणाची मूळ प्रणाली गुरु शिष्यप्रणाली ही शाळांसाठी कितपत उपयुक्त आहे? हा विषय आम्हांला कसा मांडायचा आहे? त्यासाठी कोणकोणत्या साहित्याचा, सामग्रीचा वापर करायचा? कुठले उपक्रम राबवायचे? कुठल्या योजना आपल्याजवळ आहेत? हा सर्व विचार करून संगीत विषय अधिकाधिक सोप्या, सुलभ पण रुचीपूर्ण पद्धतीने मुलांना कसा शिकविता येईल, तसेच संगीताचा मूळ उद्देश 'आनंद निर्मिती' कसा टिकविता येईल याचे प्रयत्न करावे लागतील. नवनवे उपक्रम, योजना आखाव्या लागतील. इतर विषयांशी संगीत विषयाचा परस्पर संबंध साधून मनोरंजनात्मकदृष्ट्या विषयांचे ज्ञान आपण मुलांना देऊ शकतो. केवळ स्वागतगीत व कार्यक्रमापुरती गीते बसविण्यापुरती संगीत शिक्षकांची भूमिका नसावी.

संगीत शिक्षण प्रणालीबाबत जेव्हा मी विचार केला तेव्हा माझ्या लक्षात आले की, शिक्षण क्षेत्रात संगीत शिक्षणाचा प्रवेशच उलट्या क्रमाने झाला आहे. कारण संगीत हा एक विषय म्हणून सर्वप्रथम महाविद्यालयांमध्ये सुरू झाला आणि नंतर शाळांमध्ये संगीताला एक विषय म्हणून मान्यता मिळाली. त्यामुळे संगीत कला ही गुरुमुखी विद्या असल्यामुळे, महाविद्यालयीन स्तरावर विशेष कोणताही फरक न करता त्याच शिक्षण प्रणालीचा अवलंब करून संगीताचे ज्ञान दिले जाऊ लागले व विद्यापीठातून तसाच अभ्यासक्रम तयार केला गेला. पण... संगीत हाच विषय जेव्हा शाळांमध्ये सुरू झाला तेव्हा मुलांचे वय, मुलांची वर्गातील एकूण संख्या, मुलांची सांगितीक ग्रहण क्षमता इत्यादी गोष्टी प्रश्नचिन्ह म्हणून समोर उभ्या राहिल्या आणि प्रत्येक संगीत शिक्षकांसमोर काय शिकवावे? आणि कसे शिकवावे आणि अभ्यासक्रम कोणता ठेवावा हा प्रश्न नक्कीच उभा राहिला. आजही बऱ्याच शाळांमध्ये कोणत्याही प्रकारचा संगीतविषयक निश्चित अभ्यासक्रम नाही. स्वागतगीत, सामूहिक गीत इथपर्यंतच संगीत शिक्षण मर्यादित राहिले आहे. नाही तर जास्ती जास्त अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालयाच्या पहिल्या दुसऱ्या परीक्षांचा अभ्यासक्रम सरळ-सरळ राबवला जातो. खरे तर आज आनंदाची गोष्ट आहे की, प्रत्येक शाळेमधून कलाविषय ठेवले जातात. त्यामुळे मुलांच्या स्वतंत्र अभिव्यक्तीला निकोप संधी मिळते.

गायन, वादन आणि नृत्य म्हणजे संगीत पण... अधिकांश संगीत विषय म्हणजे केवळ गायन हेच गृहीत धरून शिकवले जाते. सर्वच विद्यार्थ्यांचा गळा गायना-योग्य असेल असे नाही. त्यासाठी वाद्य संगीत शिकवण्याची सोय शाळांमधून असली पाहिजे. काही शाळांमध्ये मात्र गायन, वादन-नृत्य हे तीनही विषय शिकविण्यासाठी वेगळे शिक्षक आहेत. तसेच काही शाळांमधून स्कूल बँड मधून काही वाद्ये निवडक मुलांना शिकायला मिळतात.

संगीत शिक्षकांना दुहेरी तिहेरी जबाबदाऱ्या असतात. सर्वप्रथम संगीताचा उद्देश सर्व मुलांना कलाकार बनवणे नसून संगीताच्या माध्यमातून मुलांच्या जीवनाचा संस्कारमय सर्वांगीण विकास करणे हा आहे. संगीताचा कान त्यांना देणे. केवळ परीक्षार्थी न बनवता, कानसेन बनविण्याकडे प्रयत्न असणे. त्यासाठी -

१) बालमानसशास्त्राच्या आधारावर व शारीरिक

क्षमतेच्या व आवाज धर्माच्या आधारावरच मुलांच्या संगीत साधनेला प्रारंभ व्हायला हवा.

२) मुलांच्या वयोगटानुसार वर्गानुसार निश्चित अभ्यासक्रमाचा विचार व्हावा.

३) साधारणपणे अ) ५ ते ७ वर्षे - मुलांमध्ये संगीताचे संस्कार करणे (विविध गीतांमधून), ब) ७ ते ९ वर्षे - स्वर व लयीचा बोध करणे, क) ९ ते ११ वर्षे - स्वरांचा लगाव व ताल ज्ञान, ड) ११ ते १४ वर्षे - संगीतातील विविध गीतप्रकार, शैलींचा परिचय व ताल ज्ञान शिकवायला हवे.

४) शिक्षकांनाही लहान मुलांना शिकविण्यात मनापासून रुची हवी. मुलांना शिकविताना मी फार मोठा कलाकार आहे ही भावना ठेवून वागणे नसावे. मुलांना निरुत्साही न करता सहजरीत्या कठीणात-कठीण भाग सोप्यात-सोप्या पद्धतीने सांगण्याचे कौशल्य शिक्षकांमध्ये असावे. संगीताचा मुख्य उद्देश, आनंदनिर्मिती हा नष्ट होणार नाही याकडे शिक्षकांचे पूर्णपणे अवधान असणे आवश्यक आहे.

स्वर आणि लय हे संगीताचे मुख्य दोन आधारस्तंभ हे लक्षात ठेवून, विविध दृकश्राव्य माध्यमातून, मनोरंजनात्मक पद्धतीने विद्यार्थ्यांना संगीत विषय आपण शिकवू शकतो. त्यासाठी -

१) आसन-बैठक - मुलांचे ताठ बसणे, श्वास नियंत्रण, भावदर्शन, लयबद्धता याकडे विशेष लक्ष देणे.

२) चार्टस्, मॉडेल्स, कलात्मक साहित्य, कॅसेटस् चित्रांचा वापर करणे.

३) स्वर-ताल ज्ञानासाठी छोटे छोटे सांगितीक खेळ, सोपे सोपे लय/तालबद्ध अलंकार.

४) ताल ज्ञानासाठी तालांवर रचलेली माहितीपर गीते, तालात बद्ध छोटे छोटे स्वरसमूह, अलंकार इ.

५) अलंकारांवरच रचलेली गीते, मध्य व द्रुत लयीची गीते, हिंदी-मराठी-पाठ्यपुस्तकातील कविता-गीते स्वरबद्ध करून शिकविणे.

६) कथांमधून, नाट्यांमधून, इतिहासातून संगीताचे महत्त्व, संगीत विषयक माहिती, प्राथमिक ज्ञान मुलांना देणे.

७) रागदारी शिकविताना प्रारंभी भूपाली, दुर्गा, सारंग, यमन, भैरवीसारखे मूळ राग घेऊन शिकविले तर बाराही स्वरांचा अभ्यास होईल.

८) बंदीशी किंवा गीते शिकविताना त्यातील काव्य सरळ, सोपे व बाल वयाला शोभेल असे, तसेच मुलांच्या बालविश्वाला कुठेही तडा जाणार नाही असे असावे.

९) वाद्यांची माहिती, संगीतकारांची माहिती देणारी सचित्र पुस्तके असावीत.

१०) बालगीतांच्या कॅसेटस्, उपयुक्त कॅसेटस् तसेच चिल्ड्रन साऊंड लायब्ररी असावी.

११) नवनवीन कार्यक्रम बसवून त्यातून मुलांच्या गुणांना वाव मिळावा. संकोच दूर होऊन आत्मविश्वास वाढावा, यासाठी त्यांना विविध कार्यक्रमातून नक्कीच संधी मिळावी. निसर्गत:च मुले स्वर आणि लयीचे रसीले असतात, हे आपण अनुभवतोच. चालत्या ट्रेनमध्ये किंवा बसस्टँडवर डकरी घेऊन किंवा दगडाचे दोन लहान चपटे तुकडे लयीत वाजवून गाताना दिसणारी लहान मुले, हॉटेलमध्ये आपल्याच मस्तीत कपबश्या एकमेकांवर लयीत वाजवून गाणारी मुलं, ही मुले उपेक्षित कलाकारच नव्हेत काय?

'युनोसारख्या' जागतिक संस्थेने संगीतविषयाला आपल्या कार्यक्षेत्रात घेतले आहे. लहान मुलांच्या

विकासात संगीत हा विषय किती महत्त्वाचा आहे आणि म्हणूनच संगीत शिक्षकांची किती महत्त्वाची भूमिका आहे हे आपल्या सहजच लक्षात येईल. या मुलांना योग्य वळण देण्याचे कार्य सुजाण पालक तज्ज्ञ शिक्षकच करू शकतात.

त्यासाठी आम्हा शिक्षकांचा चौफेर, सखोल अभ्यास असणे, नित्यरियाज, नित्यचिंतन, नित्य नवे उपक्रम, नव्या कल्पना, नव्या योजना आमच्याजवळ असणे आवश्यक आहे. कारण आज या नव्या पिढीला दृकश्राव्य माध्यमातून घरबसल्या कितीतरी ज्ञानाच्या गोष्टी शिकायला मिळतात आहे. स्पर्धात्मक युगात ही पिढी फार चिकित्सक आणि हुशार झाली आहे. त्यांना नित्य नवीन व झटपट उत्तरे हवी आहेत. अशा काळात शिक्षकांचा व्यासंग, चिंतन, अभ्यास तितकाच उत्तम हवा. त्यासाठी कलाशिक्षकांना शाळेतूनही पुरेसा वेळ मिळणे आवश्यक आहे. सांगितीक वातावरण वर्गात निर्माण होण्यासाठी एक स्वतंत्र, शांतता असणारी, एकाग्र चित्ताने शिकता येईल व संपूर्णपणे संगीताचे वातावरण निर्माण करणारी अशी स्वतंत्र खोली आवश्यक आहे. कारण शिक्षण क्षेत्रात संगीताला एक विषय म्हणून जरी मान्यता असली तरी संगीत हा विषय इतर विषयांप्रमाणे टेबल-खुर्चीवर बसून शिकविण्याचा विषय नाही. त्याची शिकविण्याची पद्धती, ग्रहण करण्यासाठी विद्यार्थ्यांची मुळात बैठकच वेगळी आहे. आपल्या शाळांमधून भारतीय संगीत शिकविले जाते. त्यामुळे त्याची बैठक भारतीयच राहणार. त्यामुळे संगीताचे वातावरण निर्माण होईल अशी आपली संगीत विषयाची खोली सुसज्ज ठेवणे हे आम्हा शिक्षकांचे काम. विद्यार्थ्यांमध्ये सांगितीक रुची वाढविण्यासाठी आम्हांला पुढील गोष्टी करता येतील.

- संगीत क्षेत्रात होणाऱ्या नित्यनवीन बदलांबद्दल माहिती मिळविणे.
- कलाकारांच्या गायन-वादनाच्या कॅसेटस्, सीडी ऐकविणे.
- संगीतावरील चित्रपट दाखविणे, नियतकालिके, मासिके वाचणे.
- संगीतविषयक संमेलने, सेमिनारस्, मैफली ऐकणे, सांगितीक चर्चेत भाग घेणे.
- संगीतविषयक कार्यरत संस्थांना भेट देणे.
- स्वर लयीचा सहज अभ्यास होण्यासाठी नवनवीन सुगम-सोप्या स्वररचना शिकविणे.
- शास्त्र आणि क्रियात्मक दोन्हींचा सोबतच अभ्यास होण्यासाठी सांगितीक पारिभाषिक, संज्ञावरती, तालांवरती गीते रचून सोप्या चालीत शिकविणे.
- वेगवेगळ्या लयीत तालात आकर्षक स्वरावलींची रचना तयार करणे.
- बालविश्वाशी संबंधित गीते, बालवयाला साजेल अशा बंदिशी शिकविणे.
- चित्र, नृत्य, नाट्य, चार्टस्, खेळ, दृकश्राव्य माध्यमातून स्वरलय रसभाव, संगीतशास्त्र यांचा अभ्यास करवून घेणे.
- मुलांमध्ये सामाजिक, राष्ट्रीय, सांस्कृतिक, पर्यावरणविषयक जाणीवा-भावना निर्माण करणारी गीते शिकविणे.

उदा. प्रार्थना गीते, क्रांतिगीते, देशभक्तिपर गीते, भजन, अभंग, बालगीते, ऋतुगीते, मुल्यांवर आधारित संस्कार गीते, वर्णमाला गीते, कथा गीते इ. प्रकारची गीते. यातूनच एक संस्कारक्षम मन तयार होत असते. संगीत हा प्रथम मनाचा विषय आहे. समाजण्यापेक्षा अनुभव घेण्याचा विषय आहे. एक अनुभूती आहे. त्यामुळे संगीतातून होणारे

संस्कार कायम टिकणारे असतातच. पण प्रत्यक्ष मनावरच ते होत असतात. म्हणून संगीत इतिहासातील एक नर गायक उस्ताद 'बडे गुलाम अली खाँ' यांनी म्हटले आहे. 'हिंदुस्तानातील, प्रत्येक घरातील एका व्यक्तीने जरी संगीताचे शिक्षण घेतले असते तर आमचा भारत देश कधीच दोन तुकड्यामध्ये वाटला गेला नसता.'

संगीत मानवी जीवनासाठी संजीवनी आहे. संगीत माणसाचे शरीर, मन, आत्मा यांना एक चैतन्यशक्ती प्रदान करते. ज्याने आमचे जीवन संतुलित होऊन, सुखी व आनंदी राहाते. संगीत चांगल्या संस्कारांची चांगल्या विचारांची शिकवण देते. स्नेहप्रेम, प्रसन्नता, सेवावृत्ती, परोपकार, त्यागवृत्ती, शिस्त, सत्यवचन एकाग्रता, समाधान इतके सारे सुसंस्कार करण्यासाठी संगीतासारखी दुसरी जादू नाही. म्हणूनच शाळांमधून शिकणाऱ्या लहान मुलांवर जर संगीतातून असे सुसंस्कार झालेत तर एक सुदृढ, आनंदी, निरामय राष्ट्र निर्माण होण्यास सहज मदत होईल. या दृष्टीने संगीत शिक्षकांची 'सशक्त राष्ट्र' घडविण्यात फार मोठी भूमिका आहे. कारण शाळेतील संगीत विषयाचा मूळ उद्देशच मुलांना कलाकार बनविणे नसून त्यांचा सर्वांगीण विकास करणे हा आहे. शेवटी संगीत शिक्षकांची भूमिका जगत असताना काही गोष्टी आपण लक्षात ठेवू शकतो.

१) मुलांचे सांगितीक व्यक्तिमत्त्व

२) मुलांचे संगीत शिक्षण

३) संगीत शिक्षणाचे आयाम

४) मुलांना संगीत कसे शिकवाव? हा विचार

५) संगीत शिक्षणात वैज्ञानिकतेची आवश्यकता

६) संगीत शिक्षणात मानसशास्त्राची आवश्यकता

७) खेळगीते, साहित्याच्या व साहित्यिकांच्या दृष्टीकोनातून बालकाव्य, गीते

८) विविध गीते – एक अध्यायन

९) बालविश्व आणि संगीत शिक्षण, मानसिक परिणाम

१०) बालकांसाठी संगीताची उपयुक्तता

११) हिंदी सिनेमात बालगीते

१२) संगीताची विलक्षण बालप्रतिभा, त्यांच्या उत्कर्षासाठी प्रयत्न

१३) उपेक्षित बालकलाकार/बालप्रतिभा संकुचित का होते?

१४) बालसंगीतकारांच्या संभावना

१५) आवाजाच्या दुनियेत मुलांना रमविणे

१६) मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी संगीत विषयातून प्रयत्न व्हावेत यासाठी संगीत शिक्षकांना सर्व शाळांमधून इतर शिक्षकांप्रमाणेच मानाचे स्थान असावे.

अ) अधिकांश सर्व शाळांमधून संगीत शिक्षकांची भूमिका फक्त समारंभात स्वागतगीते आणि १५ ऑगस्ट, २६ जानेवारी या राष्ट्रीय सणांच्या दिवशी देशभक्तिपर गीते तयार करून सादर करणारा एवढीच असते. त्यामुळे बरेचदा संगीत शिक्षकांकडे दुय्यम दर्जाने बघितले जाते. त्यामुळे आपोआपच त्यांच्यात न्यूनगंड निर्माण होतो. संगीत शिक्षकांची नियुक्तीसुद्धा इतर विषय शिक्षकांप्रमाणेच असावी. प्राथमिक ते हायस्कूल (वर्ग १ ते १०) पर्यंत संगीत शिक्षण आवश्यक केले जावे. कारण ...

ब) आमचे राष्ट्र पल्लवीत होण्यासाठी संगीतासारखे सुरेल, सुंदर आणि शक्तिशाली माध्यम दुसरे कोणतेही नाही. आज जवळजवळ सर्वच शाळांमध्ये संगीत विषय

अनिवार्य आहे. आम्ही सर्व संगीत शिक्षक फार भाग्यवान आहोत की संगीताच्या माध्यमातून बालकांचा सर्वांगीण विकास करून स्वराज्याचे सुराज्य करण्याची, सशक्त राष्ट्र बनविण्याची सुंदर संधी आम्हांला मिळाली आहे. म्हणूनच शाळेतून संगीत विषयासाठी नव शिक्षण प्रणालीचा आणि संगीत शिक्षकांची भूमिका स्पष्ट होण्याचा प्रयत्न झाला पाहिजे.

**संध्या देशमुख**
महाराष्ट्र बालशिक्षण परिषद,
वर्धा शाखा

●●●

(महाराष्ट्र बालशिक्षण परिषदेचे अधिवेशन एक दोन वर्षांपूर्वी ठाण्यात झाले होते. त्या अधिवेशनात सादर केला गेलेला हा निबंध. महाराष्ट्र बाल शिक्षण परिषदेच्या ठाणे शाखेच्या श्रीमती कुमुदिनी बल्लाळ व सौ. विशाखा देशपांडे यांच्या सौजन्याने हा निबंध दिशात घेत आहोत.)

## अवकाश संशोधनातील महत्त्वाचे टप्पे

**पहिले अंतराळ्यान :**

४ ऑक्टो. १९५७ रोजी रशियाने सोडलेले स्पुटनिक – १ हे यान. वजन ८४ किलो. वेग ताशी सुमारे २८,६०० कि.मी.; पृथ्वीभोवती २८८ ते ९५० कि.मी. उंचीवरील भ्रमणकक्षेतून या यानाने ९२ दिवस भ्रमण केले.

**अंतराळातील पहिला मानव :**

एप्रिल १९६१ मध्ये वोस्टोक – १ यानातून रशियाचा युरी गागारिन हा पहिला मानव अंतराळात गेला. गागारीन १ ता. ४८ मि. अंतराळात होता.

**अंतराळात प्रवेश करणारी पहिली महिला :**

रशियाची वॅलेन्टिना तेरेश्कोव्हा ही १६ जून १९६३ रोजी वोस्टोक–७ या अंतराळात गेलेली पहिली महिला.

**अंराळातील पहिली रपेट (स्पेस वॉक) :**

१८ मार्च १९६५ रोजी रशियाच्या अलेक्सी लिओनोव याने वोश्कोड –२ यानातून प्रवास करताना पहिली रपेट केली.

**चंद्रावर पाऊल ठेवणारा पहिला मानव :**

२१ जुलै १९६९ रोजी सर्वप्रथम नील आर्मस्ट्राँगने व नंतर ऑल्ड्रिनने चंद्रावर मानवी पाऊल ठेवले. नील २ ता. १३ मि. तर ऑल्ड्रिन १ ता. ५३ मि. चंद्रभूमीवर होते.

**अंतराळात सर्वात जास्त काळ वास्तव्य :**

ब्लादिमीर टिटोव्ह आणि मुसा मानारेव्ह या दोन रशियन अंतराळवीरांनी २१ डिसेंबर १९८७ ते २१ डिसेंबर १९८८ असे ३६६ दिवस अंतराळात रहाण्याचा विक्रम केला आहे.

**अंतराळयानाचा सर्वांत प्रदीर्घ प्रवास :**

१९७८ मध्ये अमेरिकेतील केनेडी अवकाश केंद्रातून अवकाशात पाठविलेले पायोनियर–१० या अवकाशनाने २७ वर्षे सतत प्रवास करून संदेश पाठविले. आता या यानावरून संदेश मिळणे अवघड झाल्याने या यानाचा संपर्क थांबवला आहे. हे यान सूर्यमालेच्या कडेला गेले असावे.

संग्रहातून

पुस्तक परिचय

# मनाच्या श्लोकांची चरणसूची

मराठी साहित्यातील अजरामर असे जे साहित्य आहे ते म्हणजे संतांचे साहित्य. जीवनातील साध्यासुद्धा प्रसंगांपासून अध्यात्ममार्गातील गूढ अनुभूतींपर्यंत अतिशय विस्तृत असे अनुभव या संत साहित्यातून व्यक्त झालेले दिसतात. 'संत साहित्य' ही संज्ञाही फार व्यापक आहे. मुक्तेश्वरांच्या काळापासून या शतकातील संतांच्या निर्मितीपर्यंत हा शब्द प्रयोग केला जातो. यामध्ये ज्ञानेश्वरी, गाथा साहित्य, दासबोधादी विदग्ध ग्रंथराज तर येतातच; शिवाय स्फुटरचना, भारूड, अभंगादी साहित्य फार प्रचंड प्रमाणात आहे.

साहित्य, सामाजिक शास्त्रे यांचा अभ्यास करणारे अभ्यासक व संशोधक यांना या साहित्यातील दाखले, अवतरणे यांचे संदर्भ पदोपदी लागतात. आपण मांडत असलेल्या मताच्या पुष्ट्यर्थ ते अशी अवतरणे वापरतात. या अभ्यासक वर्गाप्रमाणेच महाराष्ट्राला अतिशय मोठी परंपरा असणारी जी कीर्तन, प्रवचन परंपरा आहे, या परंपरेतील कीर्तनकार, निरुपणकार यांनाही या संदर्भांची सातत्याने गरज भासते.

असा शोध घेण्याचे उत्तम साधन म्हणजे या साहित्याच्या विविध दृष्टिकोनांनुसार बनवण्यास आलेल्या सूची हे होय. चरणसूची, विषयसूची, अभंगसूची इ. प्रकारच्या सूचींचा वापर करून आपल्याला हव्या असणाऱ्या संदर्भाप्रत जाणे शक्य असते. ज्ञानेश्वरी, गाथा, दासबोधादी ग्रंथांच्या अशा सूची बनवण्यात आलेल्या आहेत. तरीही अजून पुष्कळ साहित्य असे आहे की ज्याचा सूचीच्या अभावामुळे परामर्श घेतला गेलेला नाही. नरहरी सोनार, सावता माळी असे अनेक संत असेही आहेत की त्यांच्या रचनांचे संकलन, संपादनही परिपूर्ण नाही. सूची वाङमयाचे एकूणच महत्त्व आपल्याकडे लक्षात घेतले न गेल्याने सूचिकार्य करणारांसाठी मोठे काम शिल्लक आहे.

श्री समर्थ रामदास स्वामींचे मनाचे श्लोक हे असेच उदाहरण आहे. रामदास स्वामींच्या २०५ श्लोकांचे महत्त्व न जाणवलेले अनेक अभ्यासकही आहेत. रामदास स्वामींनी रचलेले हे श्लोक इतके महत्त्वाचे आहेत की केवळ साहित्य व जीवन धर्मच नव्हे तर मानसशास्त्रातही यावर सातत्याने संशोधन होत राहणे गरजेचे आहे. ४ ओळींचा एक श्लोक असे २०५ श्लोक म्हणजे ८२० ओळींची चरणसूची वर म्हटल्याप्रमाणे उत्तम साधन ठरू शकते.

पवई (मुंबई) येथील दासबोध अभ्यास मंडळाचे उपासक, समर्थ भक्त व श्री.प.प. भगवान श्रीधर स्वामींचे अनुग्रहित श्री. नानासाहेब भाऊ मोरे (उर्फ मोरेबुवा) यांनी अशी सूची बनवली आहे. 'श्रीमत् श्री समर्थ रामदासस्वामी विरचित श्री मनाचे श्लोक चरण-सूची' या नावाने पुस्तिकेच्या स्वरूपात ही सूची त्यांनी उपलब्ध करून दिली आहे. श्री समर्थांच्या मनाच्या श्लोकांतील एखादा चरण (उदा. मना बोधितां बोधितां बोधताहे) कितव्या श्लोकामध्ये कोणत्या क्रमांकावर आलेला आहे (वरील उदाहरण श्लोक क्र. १५१ चरण क्र. २) हे अचूकपणे या सूचीवरून समजणे (पुस्तिकेतील पृ. क्र. ४४)

अभ्यासक, निरुपणकार यांचा शोध अधिक सुलभ व्हावा, मुख्य म्हणजे अशा अभ्यासकांचा अत्यंत अनमोल असा वेळ वाचावा या दृष्टीने या सूचीतील चरण अकारविल्हे (अनुवर्णानुसार) दिले आहेत. समर्थांनी मनाला केलेला हा उपदेश, या सूचना आहेत. स्वाभाविकपणे अनेक चरणांची सुरुवात 'मना' हे संबोधन वापरून होते. असे ८२ चरण आहेत.

अतिशय महत्त्वाच्या, उपयुक्त अशा या सूचीत श्री समर्थांचा जीवनपट, श्रीधर स्वामींचा जीवनपट मनोबोधाची आरती इ. नित्योपासनेच्या दृष्टीने काही साहित्यही संकलित केले आहे. उपासकांना त्याचा संदर्भ म्हणून उपयोग होईल. श्रीधर स्वामींचे छायाचित्र, पवई येथील श्री मारुतीचे छायाचित्र यांचाही या पुस्तिकेत समावेश आहे.

उत्तम मुद्रण असणारी 'खिसा आवृत्ती' म्हणावी अशी ही पुस्तिका आहे. श्री स्वामी समर्थांच्या साहित्याचा सविस्तर अभ्यास करणारे, त्यांच्या साहित्यावर प्रवचने करणारे अनेक जण महाराष्ट्रात आहेत. महाराष्ट्रभूषण नानासाहेब धर्माधिकारी यांचेही हे जीवनव्रत होते हे सर्वज्ञात आहे. अशा लहान मोठ्या अभ्यासकांनी संग्राहात ठेवावी अशी ही सूची आहे. मनाच्या श्लोकांपर्यंत नेणारा हा दुवा आहे.

इच्छुकांना रु. १५/- इतका नाममात्र किमतीत सदर सूची 'दासबोध अभ्यास मंडळ, पवई मारुती मंदिर, आय.आय.टी. मेन गेट समोर, आदी शंकराचार्य मार्ग, पवई, मुंबई - ४०० ०७६' या पत्त्यावर मिळू शकेल.

- 'श्रीमत् श्री समर्थ रामदास स्वामी विरचित श्री मनाचे श्लोक चरण-सूची
- मोरे, नानासाहेब भाऊ (मोरेबुवा) (संपा.)
- मुंबई, २००९ (हनुमान जयंती)
- दासबोध अभ्यास मंडळ
- पृ. ६४ मूल्य रु. १५/- फक्त

**श्री. मोहन पाठक**
ठाणे

●●●

## *पुस्तकांचे वाचन*

*पुस्तकांची अशी एक वेगळीच दुनिया असते. तुम्ही त्या पुस्तकातील ठिकाणामध्ये मिसळून जाता. नुसत्या कल्पनेने आपण चंद्रावर जाऊ शकत नाही. परंतु चंद्रावर भविष्यात माणसांच्या वसाहती कशा असतील व त्यात काय अडचणी असतील, हे विचार आपल्या कल्पनाविश्वात सहज येतात. दुसरी दुनिया तुमच्या रूपाने पुस्तकात उतरत असते. ज्याला आयुष्यात स्वप्ने बघायची इच्छा आहे त्याला पुस्तकांइतका दुसरा चांगला मित्र नाही. पुस्तकाच्या अंतरंगाबरोबर भाषा व सांस्कृतिक संदर्भ त्याला समृद्ध करतात. हा समृद्ध खजिना लेखक आपल्या घरी घेऊन येतात.*

*आपले मर्यादित विश्व पुस्तकांच्या सहाय्याने अमर्याद, समृद्ध, वैविध्यपूर्ण होऊन जाते. ज्याला वाचनाचे वेड आहे त्याचे सर्वच चांगले लेखक आवडते असतात व अनेक भाषांमधील असतात. परंतु बरेचसे वाचन मनात राहते. मनाच्या कुपीमध्ये बंद केले जाते व काही मात्र आयुष्यभर आपल्यासोबत राहते.*

*संग्रहातून*

●●●

**दिशा संपर्क दूरध्वनी**
**२५४२६२७०**

# भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना

*२२ नोव्हेंबर रोजी नगरवाचनमंदिर, ठाणे येथे झालेल्या श्री. कुमार केतकर यांच्या व्याख्यानाच्या निमित्ताने व्यक्त झालेले विचार - संपादक*

**प्रास्ताविक :**

दिशाच्या नोव्हेंबर २००९ चा अंक ता. २१-११-२००९ ला हातात आला. दुसऱ्याच दिवशी नगर वाचन मंदिराच्या रेगे हॉल व त्यावरील ३ रा मजला या वास्तूत पद्मश्री कुमार केतकर, संपादक लोकसत्ता यांचे 'व्याख्यान' किंवा जास्त स्पष्टपणे म्हणावयाचे तर '<u>आंतरकृती संवाद</u>' पद्धतीने झाले. विषय होता '<u>शोध सत्याचा-तर्कशास्त्राने का आत्मानुभूतीने?</u>'. तिसऱ्या मजल्यावर 'व्हीडीओ कॉम स्क्रीनवरती हे व्याख्यान दृश्य स्वरूपातही ऐकावयाला येत होते. तशी व्यवस्था या संस्थेत प्रथमच करण्यात आली होती.



**कुमार केतकर संवाद साधताना**

ह्या व्याख्यानाचा हेतू हा जरा वेगळा होता. काही ज्येष्ठ श्रोत्यांना कुमार केतकरशी संवाद करण्याचा 'हक्क' प्रदान करण्यात आला होता. कुमार केतकरांचे जे ('Non-political'), 'अ-राजकीय' लिखाण प्रसिद्ध होत होते, त्यावर ही चर्चा आयोजित केली होती. विशेषत: '<u>त्रिकालवेध</u>' ह्या शीर्षकाचे <u>दर शनिवारी लोकसत्तेत सदर प्रसिद्ध होत आहेत</u>, त्या विषयांना धरून ही चर्चा होती. अर्थातच, ह्या सर्व लेखात विज्ञान, साहित्य व संस्कृती ह्या ढोबळ संदर्भाखाली सगळ्या जगांत जे नावाजलेले विचारवंत आपले विचार मांडतात व जे बहुतांशी वा प्रामुख्याने भौतिकवादी व 'मानवी तर्कशास्त्रावर' आधारलेले विचार आढळतात त्यावरचे माहितीपूर्ण परिचयात्मक व्याख्यान, कुमार केतकरांनी दिले. ते अत्यंत विद्वत्तापूर्ण, मनोरंजक व काही मूलगामी (मानवी जीवनाच्या) प्रश्नांना धरूनच झाले. त्या व्याख्यानाचा हा काही 'रिपोर्ट' नव्हे. कारण, हे व्याख्यान एका प्रकारची पूर्वरंगाची मांडणी करणे हाच हेतू होता. भौतिकवादी तर्कशास्त्रीय व वैज्ञानिक विचारसरणी 'सत्याचा' कितपत शोध घेऊ शकते - त्या प्रयत्नांच्या मर्यादा कोणत्या किंवा त्या त्या वेगवेगळ्या विचारसरणीत 'सत्याची व्याख्या कोणती' हे संदर्भ हाताळले जावे व त्यानंतर सविस्तर चर्चा पुढच्या कार्यक्रमाच्या योजनेने व्हावी हा हेतू होता.

आधुनिक विज्ञानाच्या संशोधनांच्या मार्गावर जे सत्यशोधनाचे प्रयोग चालू आहेत. त्यांचे परिचयात्मक वर्णन कुमार केतकरांनी केले. व्हॉयेजर ह्या स्पेस व्हेईकलने विश्वात जी उडी घेतली त्यात आपल्या विश्वाला भेदून ते पलीकडे गेले आहे व कदाचित अनेक शतकानंतर ते एखाद्या अज्ञात विश्वांत प्रवेश करून त्यातल्या एखाद्या ग्रहावर आदळले व त्या विश्वाची माहिती आपल्याला व आपली त्यांतील जीवाणूंना देईल ह्या भरवशावर आपल्या अनुभवविश्वाच्या बाहेरील ''सत्याचा शोध'' घेतला जाणार आहे. पण केतकर पुढे म्हणाले की ह्या

भविष्यातील धाडसाला जरी थोडेसे यश आले तरी त्यांतील संवादाचा व ज्ञानाचा अर्थ 'आपल्याला' नव्हे तर पुढच्या ५० पिढ्या किंवा जास्तही अशा मानवाला होऊ शकेल. पण, तोपर्यंत ह्या पृथ्वीवर मानव असेल किंवा नाही, हे विश्व अस्तित्वात असेल किंवा नसेल व त्यातील 'मानवाचे अस्तित्व व जिज्ञासा' कोणत्या स्वरूपात असेल याचा अंदाज करणे अशक्य आहे. ह्या प्रयोगाच्या धाडसी प्रयत्नांचा जर सत्यशोधनाच्या आपल्या जिज्ञासेच्या अनुषंगाने अभ्यास करावयाचा असेल तर अनेक प्रश्न उभे रहातात.

वैदिक ज्ञान पद्धतीत व भारतीय तत्वज्ञान व संस्कृतीत, हा व अशासारखे अनेक प्रश्न 'वैदिक ज्ञानपद्धतींत सामावले जातात. (त्यालाच Vedic Epistemology म्हणतात.)

ज्ञान, ज्ञाता व ज्ञेय यांची जी त्रिपुटी आहे, त्यात ज्ञाता कोण? तर हा ज्ञाता म्हणजे 'मानव' म्हणजे केवळ १०० वर्षे ज्या मानवाला ह्या पृथ्वीवर जीवन 'प्रदान' केले आहे त्याला महायोगी अरविंद Embodied Consciousness म्हणतात. हा ज्ञाता म्हणजे मानवी जीव पण, मानवाच्या देहाचा अंत निश्चितच होणार व त्याला हे 'व्हॉयेजरने' ह्या वैज्ञानिक स्पेस व्हेईकलने पाठवलेल्या संदेशाचा काय व कोणता लाभ होणार? तसेच, ह्या व्हॉयेजरच्या ज्ञानाच्या गाठोड्यात कुठल्या प्रश्नांची उत्तरे सांपडणार? म्हणजे तो ज्या ग्रहावर आदळेल ते विश्व कोणते? त्यातील जीवाणूंचा 'फॉर्म' 'रूप' कोणते? त्यांचे व आपले समान प्रश्न कोणते? ते जीवाणू मैत्री करण्याच्या लायकीचे असतील किंवा नाही वगैरे वगैरे. म्हणजे सगळीच 'वाऱ्यावरची वरात' हा, प्रश्न धाडसी असला तरी ज्ञानाच्या योग्य मार्गावर तो धावत नाही हे नक्की!!

ह्या संशोधन व सत्य शोधनाच्या मार्गावर व त्यावर होणाऱ्या संशोधनावर पृथ्वीवरच्या पुढच्या अनेक पिढ्यांनी व संस्कृतींनी कोणत्या भंरवशावर भिस्त व भार ठेवावयाचा? हे धाडस म्हणजे पूर्ण विचारांती व पूर्ण धोरणाने व शहाणपणाने न केलेल्या प्रयत्नाचा 'अव्यापारेषु व्यापार' होय असे म्हणल्यास गैर ठरू नये.

दुसरा उल्लेख कुमार केतकरांनी केला की पाश्चात्य देशांत अशा कायदेशीर सोसायट्या स्थापन केल्या गेल्या आहेत की त्यातील 'सदस्य' मृत झाल्यास त्याच्या शरीराची विल्हेवाट न लावता, त्याला भविष्यांतील मृत शरीर पुनर्जीवन करण्याच्या वैज्ञानिक संशोधनाचा लाभ मिळावा, व तो घेऊन, ह्या जगात पुन्हा जगण्याची संधी त्या प्रस्तुत वेळेच्या वैद्यकीय प्रयत्नांतील डॉक्टरर्सनी व समाजानी द्यावी.

पुढे त्यांनीच शंका घेतल्या कीं कित्येक शतकानंतर जरी ह्या सोशल कॉंट्रॅक्टच्या तरतुदीचा व आर्थिक लाभाच्या बैठकीवर व आश्वासनांवर आधारलेल्या कृतीवर त्या 'सदस्य' मृत व्यक्तीला 'जीव' प्राप्त झाला, तरी त्याला बदललेल्या समाज व स्वत:च्या शरीराच्या संदर्भात जीवन नकोसे वाटण्याचाच संभव जास्त असेल.

हे प्रश्न 'Hypothetical', किंवा कल्पना-विलासाच्या धर्तीवर असले, तरीही त्यातील एक महत्त्वाचे गृहीत हे की <u>ती व्यक्ती म्हणजे त्याचा 'देह'</u> - की जो कदाचित जराजर्जर, डायबेटीस, ब्लड प्रेशर आणि वृद्ध असू शकेल व त्या देहातून त्याला स्वत:लाच बदललेल्या जगाचा अनुभव व भोग जगण्यात स्वारस्य नसेल. त्याला परिचित असलेल्या नातेवाईकांचा, मित्रांचा मागमूसही नसणार व नवीन जन्माला आलेल्या जीवांचे विश्व एखाद्या निराळ्याच भावविश्वात व विश्वासांवर जगत असणार-त्यामुळे-केतकरच म्हणाले की तो कदाचित 'आत्महत्याच' करणे पत्करील!!

म्हणजे सत्यशोधनाचा हा वैयक्तिक व सामाजिक प्रयत्न सुद्धा 'कालातीत्' नव्हे तर!! त्यामुळे, 'त्रिकालवेध'

घेण्याचा हा प्रयत्न मनुष्याच्या अस्थिर वैचारिक स्वार्थी भूमिकेवर, वा भोगी वैचारिक स्वार्थी भोगी वर्तनावर, वा संस्कृतीवर आधारलेलाच एक प्रयत्न ठरेल. ह्या व अशा अनेक वैज्ञानिक सत्यशोधनाच्या प्रयत्नांचा विचार केल्यावर असे लक्षांत येईल कीं आधुनिक विज्ञान धाडशी आहे पण त्यातील 'शहाणपणाला' व तर्कपद्धतीला 'भौतिकवादी ज्ञानाच्या' मर्यादा आहेत. कारण उघड आहे, देहाला Individuality मानली जात आहे, पण त्यांतील चैतन्य किंवा प्राण ह्यांच्याशी अशा संबंधीत जीवात्म्याला नाही? कारण हा विचार वेदिक आहे!! मग Individuality अविनाशित्व कुठले?

**<u>सत्य कसे जाणावयाचे?</u> :**

मग, प्रश्न असा पडतो की ह्या पिढ्यातून सत्य कसे जाणावयाचे? मुळात 'सत्य' असे काही जाणणे आवश्यक आहे काय? असल्यास कोणी व कसे? 'ज्ञाता' जर मर्त्य असेल-विनाश पावत असेल, तर ज्ञानाचे सातत्य कुणाला?

ह्या व अशा प्रश्नांची अत्यंत समर्पक उत्तरे भारतीय संस्कृतीत जपलेल्या व वर्धिष्णू ज्ञानपद्धतीत आहेत. त्या ज्ञानपद्धतीचा मोठा आधार वेद व उपनिषद आहे. ह्या विशिष्ट ज्ञानपद्धतीचा चेहरा मोहरा आधुनिक विज्ञानासारखा छोटा, विस्कळित, एकांगी व मर्यादित शहाणपणाचा नाही व अत्यंत वेगळा व वेगळ्या साधन पद्धती व ज्ञान प्रक्रियेवर आधारलेला आहे.

मग, त्या ज्ञानपद्धतीचा जो मोठा पसारा आहे त्याची सुरवात कुठे व कशी करावयाची? मी माझ्या अल्पमतीने त्याच्या काही पायऱ्या ओलांडल्या, त्या सांगतो. अर्थातच, हा मार्ग व पद्धती माझी होती, तशीच प्रत्येकाची असावयाला हवी असे नाही. कां? कारण मी- इथे 'मी' म्हणजे एक २१ व्या शतकांतला मर्त्य मानव ज्या ज्ञानेंद्रिय व विशिष्ट जन्मसिद्ध Consciousness जन्माला घेऊन आलो तो एक मामुली '<u>ज्ञाता</u>' आहे. त्याच्या पूर्वजन्माच्या किंवा जन्माअगोदरच्या संस्कारित स्थितीचे ज्ञान, मला सुद्धा व जगालाही नाही. शिवाय जे जग, पृथ्वी व प्रकृती समोर आहे, तिच्याशी नाते जोडणारी ही 'ज्ञानेंद्रिये' कुणाच्या तरी कृपेने उपलब्ध आहेत. पण, त्यांच्या मर्यादा व सत्यज्ञानाच्या कुवतीबद्दल पूर्वीच्या वा पाठीमागच्या मानवी समाजाने केलेल्या शोधांचा वारसा थोड्या अंशाने मला व साधारण पूर्णांशाने सध्याच्या वैज्ञानिक, सांस्कृतिक, धार्मिक समाजाला प्राप्त आहे.

ह्या सर्वांच्या एकसमुच्चयावयवी पद्धतीने कळत नकळत मी ह्या ज्ञानाचा मागोवा घेत आहे. तसाच तो इतरांनी घ्यावा.

पण, लक्षांत आले की ह्या मार्गात दोन भिन्न मार्ग आहेत. एक भौतिकवादी व दूसरा आध्यात्मिक, अधिदैविक वगैरे पहिल्या पद्धतीत प्राणी अवस्थेत असणाऱ्या ज्ञानेंद्रियांमार्फत जे दिसते, ऐकू येते, जाणवते तेच 'सत्य' मानून अंतिम ज्ञानाकडे जावयाचे. पण, ह्या मार्गात या विश्वाचा, प्रकृतीचा व स्वत:चा उगम कां झाला, कसा झाला, त्याचे उद्देश्य काय याचा विचार करावयाची आवश्यकता दिसत नाही. किंवा, तो प्रश्न लांबणीवर किंवा माळ्यावर (shelf) टाकण्यात धन्यता मानली जाते.

दुसऱ्या पद्धतीत मौलिक (फरक आहे) म्हणजे काय व कोणता? ह्या विश्वाच्या उगमाबद्दल निर्मातीचा विचार. ह्या निर्मीतीचा मूळ शक्तीस्त्रोताने, अत्यंत रसिकतेने मांडला आहे. त्या अर्थी तो 'स्त्रोत' त्याचा ताकतीचा, सृजनशक्तीचा मालक व निर्माता असावयाला हवा. म्हणजेच त्याची '<u>इच्छाशक्ती, ज्ञानशक्ती व क्रियाशक्ती</u>' तितकीच सामर्थ्यशाली, समृद्ध व सुसंस्कृत असावयाला हवी. म्हणूनच त्याचे वर्णन '<u>सत्यम् शिवम् सुंदरम</u>' असे होऊ शकते. त्याला पृथ्वीवरच्या समाजाने जीझस ख्राईस्ट,

पैगंबर अल्ला, इश्वर, देव, शिवशक्ती इत्यादी संकल्पनांचे रूप दिले. तेव्हा हा अहंकारी मानव हा या विश्वनिर्मीतीचेच एक अंग आहे. परिपूर्ण नव्हे पण पूर्णत्वाकडे झेप घेऊ शकणारा!!

जेव्हा, या शक्तीला - आपण म्हणूया 'ईश्वर', व त्या ईश्वरी शक्तीला मानणे हे आता आवश्यक 'गृहीत' झाले. ह्या पद्धतीलाच ''Theistic Approach to Knowledge'' असे म्हणता येईल, कारण हा प्रथम गृहीताचा 'बिंदू', हा एक आवश्यक प्राथमिक श्रद्धेचा विषय बनला व पुढच्या ज्ञानप्रक्रियेचा एक आधारबिंदू झाला. ह्या पद्धतीतील 'गृहीताची' आवश्यकता कोणती?

डॉ. सत्यप्रकाश सरस्वती (आर्य समाजिस्ट) म्हणतात - ''The primordial root of all true knowledge, and objets made known by the true knowledge, is the supreme God''

'Theism' does not merely lie in accepting the existence of God. A real theist is one, who accepts God, as the 'First Cause' in the creation of the universe, who accepts Him as the primary source of knowledge, who accepts this benevolence in the justice that we receive at His hands; and who feels the presence of his Lord always around him.

माणूस हा अनेक गूढ व अज्ञात गोष्टींनी वेढलेला आहे आणि त्याचा शोध युगेन् युगे ह्या अज्ञानाचा उलगडा करण्यात चालला आहे. तेव्हा या गृहीताचे नांव 'ईश्वर' त्याचाही शोध, अर्थातच अभिप्रेत आहे!! मग ही संकल्पना वा गृहीत नाकारून काय हाती आले? या विभिन्न दोन प्रकारच्या शोध पद्धती आहेत.

एक म्हणजे 'Theistic' इश्वरीतत्वावर विश्वास ठेवणारी. आणि दूसरी 'Evolution' म्हणजे उत्क्रांति तत्वाची आणि कार्ल मार्क्सने (social & political scientists-both) जिची प्राथमिक मांडणी पाश्चात्य वैज्ञानिक डेस्कार्ट वा डार्विनने केली. तिचा मतीतार्थ, हा की इश्वराची काही जरूरी नाही.


**First Caues ची आवश्यकता नाही :**

निसर्ग व प्रकृती ही आपोआप उत्पन्न झाली आहे व त्यात होणारे बदलसुद्धा आपोआप होताहेत व त्यातूनच 'मानव' निर्माण झाला आहे. ज्यांना जीवनाशी झगडण्याची कुवत आहे ते प्राणी जगतात व जे अशक्त आहेत ते नाहीसे होतात. वगैरे थोडक्यात ही उत्क्रांती फक्त शरीर व त्याची अनेक रूपे (Forms) म्हणजे वनस्पती, प्राणी ह्यामध्ये होत रहाते. ही पद्धती म्हणजे ''Auto Evolving System'' आणि ती कशी, कुठून आली हे प्रश्न अनावश्यक ठरविले गेले. ही शेंडा वा बूड नसलेली तर्कपद्धती झाली.

ईश्वराची किंवा आपण त्यांना 'स्पिरीच्यूऑलिस्ट' म्हणू शकू त्यांना 'ईश्वर' हे जगाच्या उत्पत्तीचे प्रथम 'कारण' व त्यानंतर ईश्वरी इच्छा, व भौतिक तळावर त्याच्या निर्मीतीतील अनेक जीव आत्म्याचे, उच्च स्तरावर, उच्च मूल्याकडे जाणारे, दिव्यत्वाकडे होणारे कालनियमित संक्रमण हा जगाच्या ज्ञानाचा 'दर्शन स्वरूपाचा' आढावा आहे. हा कार्यक्रम 'पुरुषसूक्त' ह्या वेदिक सूत्राबरहुकूम अस्तित्वात आला आहे व त्याच्या वेदिक 'aspirations' जीवनेच्या (सूप्त स्थितीतील) त्याप्रमाणे त्याचा उत्कर्ष हा एक 'Integral' समन्वयी पद्धतीने व्यक्त व अव्यक्त जगाच्या परस्पर स्वावलंबी नात्यावर व सामर्थ्यावर चाललेला आहे.

'The Riddle of this world' - आपल्या ह्या पुस्तकात महायोगी अरविंद म्हणतात की -

''It is not by "thinking out" the entire reality, but by a change of Consciousness that one can pass from the ignorance to knowledge the knowledge by which we become what we



**महायोगी अरविंद**

know.

To pass from the external to a direct and intimate inner consciousness; to widen consciousness out of the limits of the ego and the body; to heighten it by an inner will and aspiration and opening to the light till it passes in its ascent beyond Mind---''

ह्याचा एक सूक्ष्म अर्थ हा निघतो की 'ज्ञाता' हा सुद्धा काही एक 'स्थिर' चीज नाही. त्याच्या ज्ञानाच्या ग्रहण करण्याच्या क्षमतेची वाढ ही सुद्धा आवश्यक व न टळणारी गोष्ट आहे.

त्याच्या ह्या सत्य ज्ञानाच्या क्षमतेची जी अवस्था, स्थिती किंवा पात्रता व योग्यता असेल, त्या एव्हढीच त्याच्या ज्ञानाच्या गुणवत्तेची मोजदाद वा किंमत असेल. जसजशी ही क्षमता वृद्धींगत होत जाईल तसतसे त्याच्या भोवतींचे अंधकारमय जगत 'प्रकाशत जाईल' व त्या त्या प्रमाणात त्याच्या 'गुणात्मक ज्ञानाच्या' शिदोरीत 'सत्य ज्ञानाचे' माप किंवा प्रसाद पडेल.

**Ignorance of unknowable :**

प्रश्न हा पडेल कीं मग या मूलगामी दोन्ही ज्ञानपद्धतीत 'unknowable' हा अज्ञाताचा अंध:कारमय सागर 'अज्ञानच' राहील!! हे जे 'unknowable' (जाणता न येणारे वा शक्य नसलेले) अंतिम 'सत्य ज्ञान' आहे (Absolate Reality) ते विज्ञानवादी मार्गानेही न उलगडलेले वा न उलगडणारे कोडे आहे, असे काही म्हणतील व आम्ही प्रयत्नशील आहोत याची काहीजण ग्वाही देतील सुद्धा.

**परार्थ, अनुभूतीजज्ञ साक्षात्कारी ज्ञान :**

या उलट 'Spiritualist' किंवा 'अध्यात्मवादी' वा अध्यात्मशास्त्रवाले 'ज्ञाते' असे म्हणू शकतील की हे सत्य जाणण्याचे आमचे मार्ग भौतिक व पारलौकिक, योगिक, तांत्रिक व साक्षात्कारी वगैरे पद्धतींवर आधारलेले आहेत. त्यांत ज्ञानेंद्रियांची क्षमता वाढवण्याची व त्याला **'परार्थ'** ज्ञानाची दिशा देण्याची क्षमता आहे. 'परार्थ' ह्या शब्दाचा अर्थ मी पुढे सागंतोच. पण हे 'unknowable' हे अज्ञात रहाणार नाही. पण ते जरी मानवी मनाला भाषेला तर्काला वा वाचेला अगम्य राहिले, तरी आत्मिक ज्ञानाच्या स्तरावर अनुभतीजन्य ज्ञानाच्या स्तरावर जाणले जाईल. हा नुसता अंदाज किंवा भविष्य नाही तर त्याचा प्रत्यय ह्या भारतात अनेक विभूतींनी घेतलेला आहे. त्यांतील सध्याच्या काळाला जवळ ते **ज्ञानेश्वर महाराज** आहेत.

त्यांनी या परार्थ प्राप्त करण्यासाठी एक अंतरंग साधन प्राप्त केले व त्याचे वर्णन व दान ज्ञानेश्वरीच्या सहाव्या अध्यायात दिले. ज्या मर्त्य शरीरातील इंद्रियांना 'सत्यज्ञानाची' क्षमता जन्मत: नाही, त्यांना ह्या पृथ्वीतलावरच्या जीवनातच 'एक अंतरंग साधन म्हणजे 'कुंडलिनी जागृतीचा मार्ग दिला. तसेच जे ज्ञान अर्जूनाला 'भगवद्गीतेच्या १८ अध्यायातून' प्रत्यक्ष भगवान कृष्णाने दिले असे महर्षि व्यास सांगताहेत त्या **'ब्रह्मविद्येचा'** व



**संत ज्ञानेश्वर महाराज**

ब्रह्मज्ञानाचा अर्थ-परार्थ मराठीतून सांगितला जसा की -

**'बोली अरुपाचें रुप दावीन।**
**अतींद्रिय परी भोगवीन।**
**इंद्रियकरवी ।।६.३६।।**

अशी प्रतिज्ञा करून परतत्वाला स्पर्श करणारे सिद्धयोगाचे दर्शन ज्ञानेश्वरीच्या रूपाने घडविले! कोण झाले हे 'ज्ञाते' तर, त्यांचे भक्त सावतामाळी, सेनान्हावी, गोरा कुंभार, नामदेव, तुकाराम व इतर अनेक 'सामान्य स्त्रिया व पुरुष.'

ह्या विश्वाच्या रचनेचे स्वरूप, छोट्या व लहानग्या मानवाला 'सत्यदर्शनाच्या' क्रियेने कां प्राप्त होत नाही, त्याचे कारण त्या रचनेतील सृष्टीनिर्मातीच्या क्रियेमध्ये जी मूळ शक्तीपासून जडाकडे उतरंड आहे, त्या क्रमात गुणात्मक पद्धतीने हेतु पुरस्सर भेद निर्माण होतात. स्वतंत्र दालने निर्माण होतात, पार्टिशन खोल्या बांधल्या जातात.

त्या 'भेदांचे' प्रथम स्वरूप वेदांत सांगितल्याप्रमाणे 'तत्व' निर्मीती ज्यांची शब्द ज्ञानात **'आकाश, वायु, तेज, जल, पृथ्वी'** ही होत. ह्या शब्द संकल्पना सद्यस्थितीत व्याकरण प्रधान मानवी भाषेतील नव्हेत, तर 'देवभाषा' (संस्कृत) ह्या स्पंद शास्त्रावर व माहेश्वरी सूत्रांवर आधारलेल्या व नादानुसंधानाने अर्थ (परार्थप्राप्ती करून देणाऱ्या) संस्कृत भाषेने व तिच्या मंत्रशक्तिच्या आधाराने!!

त्यातील दूसऱ्या क्रमांकाची निर्मीती म्हणजे **शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध** ह्या संकल्पनांची निर्मीती.

त्यानंतर मानवी स्वरूपाला पोषक अशी मूलगामी **''वेदिक पुरुष''** संकल्पना ही पुरुषसुक्तातील (ऋग्वेदातील) १६ सूक्तांच्या क्रमाने होणारी निर्मिती.

ह्या 'मानवी देहांतल्या आत्म्याला 'गणेशाच्या अथर्वशीर्षातील' संकल्पनेप्रमाणे मूळ शक्तीस्त्रोताला (निर्मात्याला) जोडणाऱ्या 'नेटवर्कवर' जोडलेल्या अवयवी, इंद्रियरूपी देहाअंतर्गत शक्तिंचे प्रदान होते. हा देहाचा फॉर्म मानवी जन्माबरोबर आपोआपच जन्मसिद्ध प्राप्त होतो. त्याचे साधे अप्रुपसुद्धा 'सामान्य वा विद्वान' माणसांना वाटत नाही. हे 'मूळ अज्ञान' - मग 'जाणीव' व 'सत्यज्ञान' सोडूनच द्या. ही खंत वाटणारी गोष्ट आहे.

मग, ह्या देह, अंतरंगात ज्या अनेक शक्ति वसती करतात व कार्यरत आहेत त्यांचे ज्ञान नाथसंप्रदायी योगात व इतर योग संप्रदायांत महर्षी पतंजलींनी सांगितल्याप्रमाणे होते व असते. हठयोग, राजयोग वगैरे हे त्यांतील विशिष्ट भेद होत.

पण, ह्या सर्व यंत्रणेत जे वरकरणी भेद सोयीसाठी आहेत, त्यांना एकत्र जाण्याची युक्ती ही मंत्रशास्त्र, तंत्रशास्त्र, यंत्रशास्त्र वगैरे योगक्रियेत उपलब्ध आहे. ती एका विवक्षित वैश्विक नीतिमत्तेच्या नियमानुसार व सत्यआचार विचारांतीच केवळ प्राप्त होऊ शकते. हे महत्त्वाचे!!

ती प्राप्त झाली कीं काय होते ते मी या क्षेत्रातील अधिकारी व्यक्तींच्या शब्दातच सांगू इच्छितो.

**मंत्ररूपा भवेददेवी देवरुपो गुरुर्भवेत्।**
**गुरुरूपोभवेदात्मा आत्मरूपी मनुर्भवेत्।।**

**ही शक्ती मिळते 'श्रीयंत्ररूप'** (Cosmic plan (ब्रह्मांड, पिंड या क्षेत्रात) Symbolically drawn by Rishi) ती मंत्ररूप आहे. ती संवादी व स्पंदमयी आहे पण, हा प्लॅन जेव्हा जीवात्म्याला मंत्रचैतन्य प्राप्त करून देतो तेव्हा हा स्वत:चाच आत्मा 'गुरूरूप' होतो आणि शरीरातल्या जागृत कुंडलिनीशक्ती मार्फत Several required Transformation घडवून आणतो. ही आहे सत्यज्ञानाची प्रक्रिया जी या 'स्कीमप्रमाणे' घडून येते.

ह्या क्रिया झाल्यानंतर क्रमाक्रमाने ह्या अज्ञानी माणसाला सत्यज्ञान प्राप्त होते. हा पूर्ण 'Road Map' आजही मानवाला भारतभूमीच्या संस्कृतीत, संस्कारात, ज्ञानात उपलब्ध आहे.

दुर्दैव आहे की त्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष होते आहे. ही परिस्थिती सुधारो व सुबुद्धी होवो हीच इच्छा!!

**श्री. यशवंत साने**
सोनल अपार्टमेंट,
सारस्वत बँकेशेजारी,
अग्यारी लेन, ठाणे.
दूरध्वनी - २५३६८४५०
मोबाईल - ९००४०५१८४७
E mail : Saneyr@mtnl.net.in

●●●

## वाचा आणि विचार करा

केवळ आपुल्या स्वार्थासाठी कलह नसावा घरामध्ये।
आपुलकीच्या नात्यामधुनी स्नेह जपावा मनामध्ये।।धृ।।
येणाऱ्याला पाणी द्यावे मुखात वाणी गोड हवी।
जाणाऱ्याच्या मनात फिरूनी येण्याविषयी ओढ हवी।
ऐसा प्रेमळ माणुसकीचा झरा वहावा मनामध्ये।।१।।
भांड्याला लागतेच भांडे विसरूनी जावे क्षणामध्ये।
परस्परांना समजून घ्यावे आढी नसावी मनामध्ये।
रूसवे फुगवे नको फुकाचे मोद रहावा मनामध्ये।।२।।
नित्य काळजी घरात घ्यावी वय झालेल्या पानांची।
ज्याची त्याला द्यावी जागा वयाप्रमाणे मानाची।।
एकमताने निर्णय घ्यावा नको दुरावा मनामध्ये।।३।।
लळा जिव्हाळा आत असावा नको उमाळा वरकरणी।
नको घराला गर्व धनाचा लीन रहावे प्रभुचरणी।
दिवसा राती परमेशाचा वास असावा घरामध्ये।।४।।

संग्रहातून

रानटी हत्तींचा अभ्यास करून त्यांची मानसिकता शोधण्याचा प्रयत्न सिंथिया मॉस या महिलेने केला. हत्तींच्या कळपव्यवस्थेचा शोध तिने लावला. यातून हत्तींची संधान साधण्याची कला तिने शोधून काढली. हत्तींमधील मातृसत्ताक पद्धत आणि तिची वैशिष्ट्ये सिंथियामुळे प्रकाशझोतात आली. हत्तीच्या दोन कळपांमधून संबंध दीर्घकाळ कसे टिकतात या विषयीही संशोधनाचा तिने प्रयत्न केला.

या विषयावरील 'एलिफंट मेमॉयर्स' हे तिचे पुस्तक प्रसिद्ध आहे.

# परिसर वार्ता

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, माध्यमिक विभाग

➢ जिज्ञासा ट्रस्ट, ठाणे तर्फे घेण्यात आलेल्या बाल विज्ञान प्रकल्पात 'कचराळी तलावाभोवतालची जैविक विविघता' या विषयावर इ. ९ (अ व ब) मधील विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या प्रकल्पाची 'जिल्हा स्तरीय' पातळीवर निवड झाली.

➢ डोंबिवली ग्रंथसंग्रहालयातर्फे घेण्यात आलेल्या स्वलिखित कथा स्पर्धेत शाळेतील मृदुला मालणकर ९ (अ) व मीनल डोंबल ९ (ड) या दोन विद्यार्थीनींच्या कथांना उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले.

➢ ५५ व्या नॅशनल स्कूल गेम जिमनॅस्टिक या खेळात १४ वर्षाखालील गटात चंदिगड येथे झालेल्या राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्र संघाला सांघिक रौप्य पदक व द्वितीय क्रमांक मिळाला. या यशाची इ. ७ वी तील प्रिती टिपाले ही मानकरी ठरली.

➢ 'बाल मैफल' मराठी, हिंदी, इंग्रजी दिवाळी अंक २००९ मध्ये स्नेहल सखाराम पाटील ७ (ड) मधील विद्याथीनीचा 'शिक्षणाचे माध्यम मराठी हवे' या विषयावर लेख छापून आला आहे.

➢ 'अस्त्रविध सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड' तर्फे इ. १० वी च्या पालकांसाठी आपल्या पाल्यांसाठी पुढील आयुष्यातील शिक्षणासाठीच्या विविध संधी, शाखा, प्रवेशपरीक्षा त्यातील उच्च पदवी वगैरे संबंधी मार्गदर्शन शनिवार दि. ३१-११-०९ रोजी करण्यात आले.

➢ शाळेच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त आयोजित विविध आंतरशालेय स्पर्धांची सुरुवात दि. ०५-११-०९ रोजी 'गीत-गायन' स्पर्धेने झाली.

## सौ.आनंदीबाई केशव जोशी इंग्रजी माध्यम शाळा

➢ पी. ई. सोसायटी न्यू इंग्लिश स्कूल आयोजित इंग्रजी वक्तृत्व स्पर्धेत कु. प्रणव मोघे या इ. ९ वी तील विद्यार्थ्याला प्रथम क्रमांक मिळाला.

➢ पी. ई. सोसायटी न्यू इंग्लिश स्कूल आयोजित टेबलटेनिस स्पर्धा -

- १४ वर्षाखालील मुलींच्या संघाने विजयाची ट्रॉफी जिंकली. सहभागी विद्यार्थिनी - रिद्धी संखे, प्रणिता बनावली, वैदेही जोशी, आभा मुतालिक.
- १७ वर्षाखालील मुलींच्या संघाने उपविजेता ट्रॉफी जिंकली. सहभागी विद्यार्थिनी - राधिका राजवंशी, झील बोरिचा, मैत्री सत्रा, श्रेया बापट.
- १४ वर्षाखालील मुली वैयक्तिक - रिद्धी संखे हिला सुवर्णपदक मिळाले आणि प्रणिता बनावली हिला द्वितीय पारितोषिक मिळाले.

➢ **राष्ट्रीय बाल विज्ञान परिषद परीक्षा २००९ चा निकाल :**

राष्ट्रीय बाल विज्ञान परिषद आयोजित जिल्हास्तरीय स्पर्धेत आमच्या शाळेने ३ प्रकल्प सादर केले. त्यांतील दोन प्रकल्पांची प्रादेशिक स्तरावर निवड झाली. प्रकल्पांची नावे - १) जमिनीवरील पाण्याच्या पातळीवर शहरीकरणाचा परिणाम - गट प्रमुख : अनुजा बोरवणकर २) शाळेत प्लास्टिकचा उपयोग - गट प्रमुख : राज जोशी

**रिद्धी संखेचे सुयश :**

पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या रौप्य महोत्सवी

वर्षाचे औचित्य साधून पी. ई. एस. इंग्लिश मिडियम स्कूल ॲण्ड ज्युनियर कॉलेज, ठाणे यांनी दिनांक ७ व ८ नोव्हेंबर २००९ रोजी आंतर शालेय टेबल टेनिस स्पर्धेचे आयोजन केले होते.

या स्पर्धेत सौ. ए. के. जोशी इंग्लिश मिडियम स्कूलच्या रिद्धी राजेंद्र संखे या विद्यार्थीनीने मुलींच्या एकेरी गटात तीन, तर सांघिक गटात एक विजेतेपद प्राप्त करून भव्य यश प्राप्त केले आहे. १२ वर्षाखालील, १४ वर्षाखालील तसेच १७ वर्षाखालील मुलींच्या आंतर शालेय टेबल टेनिस स्पर्धेत रिद्धी संखे हिने विजेतेपदाला गवसणी घालतानाच आपल्या शालेय संघातील सहकारी प्रणिता बनावली, आभा मुतालिक व वैदेही जोशी समवेत १४ वर्षाखालील मुलींच्या आंतरशालेय टेबल टेनिस सांघिक स्पर्धेत सुद्धा विजेतेपद प्राप्त केले. मुलींच्या विविध वयोगटातील एकेरी स्पर्धेतील तीन सुवर्णपदके आणि सांघिक स्पर्धेतील एक सुवर्णपदक मिळवून सौ. ए. के. जोशी स्कूलची विद्यार्थिनी रिद्धी संखे ही 'प्लेयर ऑफ द टुर्नामेन्ट' ठरली.

## तंत्रनिकेतन

**शिक्षक दिन :**

प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ व भारताचे पहिले उप-राष्ट्रपती डॉ. सर्वोपल्ली राधाकृष्णन यांचा ५ सप्टेंबर हा जन्मदिन. हा दिवस भारतात दरवर्षी 'शिक्षक दिन' म्हणून साजरा केला जातो. वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतमध्ये ही दरवर्षीप्रमाणे या वर्षीही शिक्षक दिनाचे आयोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम शनिवार दि. ५ सप्टेंबर रोजी तंत्रनिकेतनच्या दृकश्राव्य सभागृहात पार पडला. या कार्यक्रमास वि. प्र. मंडळाच्या तंत्रनिकेतनचे प्राचार्य दि. कृ. नायक, माजी. प्राचार्य एस. एस. मुजुमदार, प्रा. डॉ. सौ. आर. के. जांभोटकर इत्यादी मान्यवर उपस्थित होते. सदर कार्यक्रमास शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते. प्राचार्य दि. कृ. नायक यांनी आपले मनोगत व्यक्त केले. मुजुमदार सर व जांभोटकर मॅडम यांचीही भाषणे झाली.




**शिक्षक दिनानिमित्त उपस्थित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करताना वि.प्र. मंडळाच्या तंत्रनिकेतनचे प्राचार्य दि. कृ. नायक**



**२० वर्षे सेवा पूर्ण केल्याबद्दल शिक्षक दिनानिमित्त श्री. संतोष बारगोडे (ग्रंथालय परिचर) व श्री. चंद्रकांत धुमाळ यांचा प्राचार्य दि. कृ. नायक व माजी प्राचार्य श्री. एस. एस. मुजुमदार यांचे हस्ते सत्कार करण्यात आला. डावीकडून दि. कृ. नायक (प्राचार्य), श्री. संतोष बारगोडे, चंद्रकांत धुमाळ, माजी प्राचार्य मुजुमदार सर, सौ. भारती जोशी**

संस्थेमध्ये २० वर्षे सेवा पूर्ण केल्याबद्दल श्री. चंद्रकांत धुमाळ व श्री. संतोष बारगोडे या दोघांचा नायक सर आणि मुजुमदार सर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

**तंत्रनिकेतनाचे एनर्जी पार्क :**

लोड शेडींगला उत्तम पर्याय म्हणून विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनाच्या प्रांगणामध्ये सौर उर्जा प्रकल्प कार्यान्वित करून ऊर्जा बचतीसाठीचा एक आदर्श ठेवला आहे. विजेची वाढती मागणी आणि पुरवठ्यात होणारी घट यामुळे राज्यात विजेचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर बनत आहे. अशा परिस्थितीत 'ऊर्जेची बचत हीच ऊर्जेची निर्मिती' ठरते. यामुळे महाराष्ट्र एनर्जी डेव्हलपमेंट एजन्सीच्या (MEDA) सहकार्याने जनजागृतीसाठी ठाण्यातील वि. प्र. मंडळाच्या तंत्रनिकेतनामध्ये एनर्जी पार्क उभारण्यात आले असून, नागरिक, विद्यार्थी अभ्यासकांना या पार्कच्या माध्यमातून शिक्षण देण्यात येत आहेत.

या सौर ऊर्जा प्रकल्पाचे उद्घाटन दि. १२ सप्टेंबर रोजी वि. प्र. मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांचे शुभहस्ते करण्यात आले. या वेळी वि. प्र. मंडळाचे, तंत्रनिकेतनचे प्राचार्य दि. कृ. नायक, विद्या प्रसारक मंडळाचे कार्यवाह श्री. अुत्तम जोशी, श्री. श्री. वि. करंदीकर मंडळाचे खजिनदार श्री. मा. य. गोखले, श्री. दिलीप जोशी विद्युत अभियांत्रिकी विभागाच्या विभाग प्रमुख प्रा. सौ. एन. व्ही. वडेर इत्यादी उपस्थित होते. एनर्जी पार्कच्या उद्घाटनाच्या अनुषंगाने तंत्रनिकेतनने राजीव गांधी ऊर्जा संवर्धन राज्यस्तरीय निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

एनर्जी पार्कमध्ये बयोगॅस प्लान्ट, सौर उर्जेवर चालणारे ७४ मेगावॅटचे घरातील व रस्त्यावरील दिवे, १० वॅटचा सोलार कंदील, सौर ऊर्जेवर चालणारे पंप, टी.



**'एनर्जी पार्क' चे उद्घाटन करताना विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर व सोबत इतर पदाधिकारी व मान्यवर.**

व्ही., प्रेशर कुकर, वॉटर हिटर, सिस्टम इत्यादी अशीची अनेक उपकरणे उभारण्यात आली आहेत.

या प्रकल्पाविषयी माहिती देताना विद्युत अभियांत्रिकी विभागाच्या विभाग प्रमुख प्रा. सौ. एन. व्ही. वडेर म्हणाल्या की, ''विविध प्रकल्प तयार करण्यासाठी प्रथम मोकळ्या जागेत सौर ऊर्जेवर चालणारी यंत्रणा बसविली जाते. सौर ऊर्जेवरील यंत्रणेत सूर्य किरणांचा साठा यामध्ये केला जातो. या शिवाय चार्ज कंट्रोल, बॅटरी, इन्व्हर्टर या तीन साधनांचा उपयोग विविध उपकरणे चालवण्यासाठी केला जातो आणि हाच उर्जा बचतीचा उत्तम मार्ग म्हणून गणला जातो.''

सध्या सर्व जगात उर्जेची समस्या भेडसावत असून प्रत्येक देश या समस्येवर उपाय शोधण्यासाठी विविध प्रकारे संशोधन करीत आहे. सौर उर्जा हा मुबलक प्रमाणात उपलब्ध असलेला स्त्रोत. या स्त्रोताचा वापर करून उर्जेची बचत केली असता वीज निर्मितीला पर्याय उपलब्ध होतो. ज्या खेडोपाड्यात अजूनही वीजेची सोय नाही अशा ठिकाणी राहणाऱ्या नागरिकांना सुद्धा या प्रकल्पाचा लाभ होवू शकतो.

तंत्रनिकेतनच्या EPS विभाग आणि महाराष्ट्र एनर्जी डेव्हलपमेन्ट एजन्सी यांच्या संयुक्त विद्यमाने उभारण्यात आलेला हा एक स्तुत्य व उपयुक्त उपक्रम होय.

**'अभियंता दिनाचे' आयोजन :**

एम. विश्वेश्वरैया एक महान तपस्वी व राष्ट्रभक्त होते. त्यांनी भारताच्या निर्माणात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. १५ सप्टेंबर हा त्यांचा वाढदिवस. या दिनाचे औचित्य साधून दरवर्षी या महान अभियंत्याच्या कार्याची आठवण राहवी म्हणून दरवर्षी हा दिवस भारतात 'अभियंता दिन' म्हणून पाळला जातो.

तंत्रनिकेतनातही दरवर्षाप्रमाणे अभियंता दिनाचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रम तंत्रनिकेतनमधील दृक-श्राव्य सभागृहात दिनांक १५ सप्टेंबर रोजी पार पडला. या कार्यक्रमास तंत्रनिकेतनचे प्राचार्य दि. कृ. नायक, तंत्रनिकेतमधील सर्व विभागाचे विभाग प्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. प्राचार्य दि. कृ. नायक यांनी अभियंता दिनाचे महत्त्व आपल्या मनोगतात व्यक्त केले.

**'वैद्यकीय उपकरणांमधील प्रगती' या विषयावर वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन, ठाणे येथे ८ व्या राष्ट्रीय परिषदेचे आयोजन :**

ठाणे-बेलापूर हा औद्योगिक पट्टा म्हणून गणला जातो. या औद्योगिक पट्ट्यात तांत्रिक शिक्षण देणारी विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन ही अग्रगण्य संस्था आहे. तंत्रनिकेतनाने आजवर चालू घडामोडीवर विविध राष्ट्रीय परिषदांचे आयोजन केलेले आहे.

'वैद्यकीय उपकरणांमधील प्रगती' हा विषय घेऊन तंत्रनिकेतनाने शनिवार दिनांक १९ सप्टेंबर रोजी दिवशीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. ही परिषद थोरले बाजीराव पेशवे सभागृह येथे पार पडली. सदर परिषदेसाठी महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांचे अर्थ सहाय्य लाभले होते.

नानावटी हॉस्पिटलचे प्रमुख डॉ. नागराज हुईलगोल हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या प्रसंगी विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर, नानावटी हॉस्पिटलचे डॉ. दीपक पाटकर, विद्या प्रसारक मंडळाच्या, तंत्रनिकेतनचे प्राचार्य दि. कृ. नायक इत्यादी सन्मानीय मान्यवर उपस्थित होते.




**'वैद्यकीय उपकरणांमधील प्रगती' या आठव्या राष्ट्रीय परिषदे दरम्यान प्रमुख व सन्माननीय पाहुण्यांच्या हस्ते स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले.**

**डावीकडून प्रा. तुषार मोहिते-पाटील (मेडिकल इलेक्ट्रॉनिक्स विभाग प्रमुख), तंत्रनिकेतनचे प्राचार्य दि. कृ. नायक, प्रमुख पाहुणे डॉ. नागराज हुईलगोल, (नानावटी हॉस्पिटल प्रमुख) विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर, डॉ. दीपक पाटकर, प्रा. सौ. वैशाली जोशी (इन्स्ट्रुमेंटेशन विभाग प्रमुख) इत्यादी.**

परिषदेच्या सुरुवातीला तंत्रनिकेतनचे प्राचार्य दि. कृ. नायक यांनी सर्व उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले व त्यांनी राष्ट्रीय परिषद आयोजनामागची भूमिका स्पष्ट केली.

'किरणोत्सर्गाचा वापर करून कर्करोगावरील अत्याधुनिक उपचार पद्धती' या विषयावर प्रमुख पाहुणे डॉ. नागराज हुईलगोल यांनी आपले विचार मांडले. 'एम आर आय (MRI) क्षेत्रातील प्रगती' या विषयीची माहिती डॉ. दीपक पाटकर यांनी उपस्थितांना करून दिली.

सन्माननीय पाहुण्यांच्या हस्ते या परिषदेच्या दरम्यान संबंधित विषयावरील स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले. या स्मरणिकेत नामवंत डॉक्टर्स व तंत्रज्ञ यांच्या शोध निबंधाचा समावेश करण्यात आला आहे.

डॉक्टर्स, तंत्रनिकेतन व अभियांत्रिकी महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी तसेच वैद्यकीय क्षेत्रातील अभ्यासक संबंधित विषयातील जाणकार व उद्योजक यांना या परिषदेचा चांगलाच लाभ झाला.

प्रा. सौ. वैशाली जोशी (इन्स्ट्रुमेशन, विभाग प्रमुख तंत्रनिकेतन, ठाणे) व प्रा. तुषार मोहिते-पाटील मेडिकल इलेक्ट्रॉनिक्स, विभाग प्रमुख) यांनी या परिषदेचे संघटन सचिव म्हणून काम पाहिले. त्यांनी ही परिषद आयोजित करण्यात महत्त्वाची भूमिका पार पाडली.

वृत्त संकलन
**चंद्रकांत शिंगाडे**
वि. प्र. मंडळाचे, तंत्रनिकेतन ठाणे.

●●●



## चार गोष्टी ४ च्या

| | | |
|---|---|---|
| चार वेद | – | ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद |
| उपवेद | – | आयुर्वेद, धनुर्वेद, गांधर्ववेद, अर्थवेद |
| दिशा | – | पूर्व, पश्चिम, दक्षिण, उत्तर |
| उपदिशा | – | ईशान्य, वायव्य, आग्नेय, नैऋत्य |
| धाम | – | बदरीनारायण, द्वारका, रामेश्वर, जगन्नाथपुरी |
| पुरुषार्थ | – | धर्म, अर्थ, काम, मोक्ष |
| देह | – | स्थूल, सूक्ष्म, कारण, महाकारण |
| अवस्था | – | जागृत, स्वप्न, सुशांती, तुर्या |
| वाणी | – | परा, पश्यन्ति, मध्यमा, वैखरी |
| आकाश | – | घटाकाश, जलाकाश, मेघाकाश, महाकाश |
| भक्त | – | आर्त, जिज्ञासू, आर्जवी, मुक्त |
| चैतन्य | – | जीवनचैतन्य, इहचैतन्य, कुरस्थचैतन्य, ब्रह्मचैतन्य |
| मनुष्याचे प्रकार | – | पामर, विषयी, जिज्ञासू, मुक्त |
| मुक्ती | – | सलोकता, समीपता, सरूपता, सायुज्यता |
| बुद्धीचे प्रकार | – | देहबुद्धी, आत्मबुद्धी, गुरुबुद्धी, स्त्रीबुद्धी |
| दासाचे प्रकार | – | अधिकृत, आश्रित, परिषद, अनुग |
| स्थूल देहाचे भाव | – | सकाम, अनाचार, दुराचार, सदाचार |
| युग | – | त्रेतायुग, कृतयुग, द्वापारयुग, कलियुग |
| आश्रम | – | ब्रह्मचर्य, गृहस्थी, वानप्रस्थ, संन्यास |

(मुखपृष्ठावरून)

संपादकीय

**कोपनहेगनच्या निमित्ताने**

वरकरणी सोपा वाटणारा पण आजची आंतरराष्ट्रीय राजकरणाची दिशा पाहता अवघड ठरेल असा हा उपाय आहे. त्यात म्हटल्यानुसार जगातील सर्वच देशांनी एकत्र येऊन भविष्यासाठी एकत्रितपणे व वेगळ्या दिशांनी प्रयत्न केले तर ही समस्या काही प्रमाणात आटोक्यात येईल.

जे राष्ट्रीय नेतृत्वाबाबत आहे तेच काही प्रमाणात आंतरराष्ट्रीय राजकीय नेतृत्वाबाबतचेही निरीक्षण आहे, असे काही व विचारवंत सांगतात. हे निरीक्षण असे सांगते की, विज्ञान तंत्रज्ञानाच्या सर्व शाखांमधील दैनंदिन प्रगती आणि तंत्रप्रधान उपकरणांचे जग एकीकडे आहे, तर या शाखांचे उपयोजन कसे करायला हवे याची जाण नसणारे राजकीय नेतृत्व दुसऱ्या बाजूला आहे. दर्जेदार शिक्षण देणाऱ्या संस्था विज्ञान शिक्षण समाजाभिमुख बनवू पाहत आहेत, पण राजकीय इच्छा शक्तीच्या अभावामुळे हे प्रयत्न फलद्रूष होत नाहीत. ही दरी वाढत चालल्याने हवामान बदलासारखे प्रश्न कठीण बनत आहेत. सामूहिक रीतीने प्रयत्न करावयाचे झाल्यास राजकीय नेतृत्वात अपेक्षित असणारी प्रगल्भता यावी लागेल. विकसित देशांचे व विकसनशील, अविकसित देश यांचे राजकारण समजावून घ्यायचा प्रयत्न केल्यास एकत्रितपणे ठोस उपाय करावेत ही इच्छा म्हणजे भाबडे स्वप्नरंजन ठरेल. अविकसित व विकसनशील देशांत तर विज्ञान तंत्रज्ञानाच्या उपयोजनाचा विचार करण्याची प्रगल्भता सर्वसामान्य राजकीय नेत्यांत आढळून येत नाही. त्यामुळे, प्रश्नांचे गांभीर्य ही बाब आकलना पलीकडे जात आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावरील परिषदा, संमेलने, साजरे केले जाणारे दिवस, सप्ताह या सर्वांच्या निमित्ताने विचार मंथन होते. विचारवंतांच्या अभ्यासाचे मंथन होते, पण ते इतिहासातील एक नोंद या स्वरूपातच राहते. उपाय, ठराव यांचा गंध या सामान्य कुवतीच्या राजकीय नेतृत्वाला नसते.

आपल्या देशाची गणना विकसनशील देशांमध्ये होते. विकसनशील देशांच्या विकासातील गतीसाठी जागतिक बँकेसह अनेक आंतरराष्ट्रीय संघटनांचे आर्थिक, तांत्रिक सहकार्य उपलब्ध आहे. क्लायमेट इन्व्हेस्टमेंट फंड, पुनर्नवीकृत उर्जेसाठी दिले जाणारे साहाय्य अशा कितीतरी योजना आहेत. (http: //beta.worldbank.org/climate या संकेतस्थळाचा संदर्भ उपरोक्त संपादकीयात आहे.) परंतु विकासाची स्वप्ने दाखवत भकास करण्याच्या स्वार्थी राजकीय नेतृत्वाने आपली अवस्था दिशाहीन केली आहे. लोकप्रतिनिधींना निवडून येण्यासाठी शैक्षणिक अर्हता आवश्यक नसल्यामुळे व नोकरशाहीवर विसंबून राज्यराकट हाकण्याच्या शैलीमुळे आपले नेतृत्व (अपवादांचे भान ठेवूनही) हे व असे प्रश्न समजू शकेल याच्या शक्यताच नाहीत. विकसनशील देशांसाठी असणाऱ्या सुविधा, त्यांचे उपयोग त्या प्राप्त करण्याचे प्रयत्न हा एक भाग झाला. त्या मिळाल्या तर त्यांचा वापर हा दुसरा भाग झाला. या सर्व प्रक्रियेत सत्तालोलुप वृत्ती अनेक मूलभूत प्रश्नांची तीव्रता अधिकच गहन करताना दिसत आहे.

एनजीओ म्हणजे अशासकीय संघटनांकडून काही भरीव प्रयत्न होण्याची अपेक्षा असते. परंतु श्रेय घेण्यासाठी, स्पर्धेत टिकण्यासाठी अशा संघटनाही राजकारण ग्रस्त होत चालल्या आहेत. अशा संघटनांचे सेवा कार्य आता व्यावसायिकीकरणाच्या प्रवाहात वाहत चालले आहे. त्यामुळे एकत्रितपणे सर्व देशांनी जो भार उचलावा अशी किमान अपेक्षा आहे ती कितपत पूर्ण होईल हा प्रश्नच आहे.

हवामान बदलातील अनियमितता वाढत चालल्याने

मानवी जीवनावर होणारे परिणाम गंभीर बनत आहेत. हे दुर्दैव आहे. कोपेनहेगन मधील परिषदेच्या निष्पत्तीकडे म्हणूनच जगातील हा प्रश्न समजू शकणारांचे डोळे लागले आहेत.

राजकीय नेतृत्वाबरोबरच या प्रश्नाचे मूळ आणखी एका गोष्टीत आहे व ती म्हणजे आजची जीवनशैली. ही जीवनशैली सर्वसाधारणपणे मानवकेंद्रित आणि आत्मकेंद्रित प्रेरणांनी प्रेरित झालेली आहे. या जीवनशैलीचा उगमही पाश्चात्य देशांमधला आहे. कोणतीही किंमत देऊन येथेच्छ उपभोग घेणे हा या जीवनशैलीचा मूलमंत्र आहे. व्यापारीकरण व बाजारीकरण हे या जीवनशैलीचे माध्यम आहे. जीवन एकांगी नसून परस्परावलांबी आहे हे या जीवनशैलीला मान्य नाही. त्याचा परिणाम आवडीनिवडींपासून तत्त्वज्ञानापर्यंत माणूस पराकोटीचा स्वार्थी होण्यात झाला आहे.

या जीवनशैलीचा प्रभाव आहार, आचार व विचारांवर पडलेला आहे. आजची पर्यावरण व हवामानाची परिस्थिती याला हीच मानवी जीवनशैली जबाबदार आहे हे विज्ञानाने सिद्ध केले आहे. दुर्दैवाने या सर्वच परिषदा मूळ मुद्द्याला हात न घालता वरवरच्या लक्षणांवर उपचार केल्याचा आभास निर्माण करत आहेत. विकसित राष्ट्रांची आजची भूमिका 'करून करून भागले अन देवपूजेला लागले' अशी आहे. तर विकसनशील देशांची भूमिका 'तुम्ही केले, मग आम्ही का नाही' अशी आहे.

मानवी भविष्याच्या दृष्टीने हे दोन्ही विचारप्रवाह हानिकारक आहेत. मानवी षड्रिपुंवर नियंत्रण आणणे ही साधी गोष्ट नाही. ती मानवाच्या अस्तित्वापासून त्याच्यावर संस्कारित करावी लागते. धर्म संकल्पना, नीतीनियम, समाजरचना या सर्वांमधून ही बंधने माणसावर आणावी लागतात.

याबाबतीत भारतीय विचारधारा समृद्ध आहे. आजही ही विचारधारा जगाला मार्गदर्शक ठरणारी आहे. घेण्यापेक्षा देण्यावर तिचा भर आहे. भपकेबाजपणापेक्षा साध्या राहणीस या विचारधारेची मान्यता आहे. लक्ष्मीपेक्षा सरस्वती वंदनीय मानणारी ही विचारसंस्कृती आहे. पण आशाळभूतपणे पाश्चात्य देश म्हणजे प्रगती व त्यांचे अनुकरण म्हणजे विज्ञाननिष्ठा या चुकीच्या धारणेमुळे भारतीयांची अवस्था 'ना घरका, ना घाटका' अशी झाली आहे. सुधारणांच्या नावाखाली धर्माची मोडतोड करणे, संस्था जीवन उध्वस्त करणे हे त्यामुळेच घडत आहे.


म्हणूनच, या सर्व गोष्टींचा विचार राजकीय नेतृत्वापुरता मर्यादित न ठेवता प्रत्येक व्यक्तीने करावयास हवा. त्यानुसार जीवनशैली बदलायला हवी. ही जीवनशैली म्हणजे दुसरे तिसरे काही नसून 'साधी राहणी' हा विचार आहे.

●●●

## *अनावश्यक खरेदी*

*मॉलमध्ये किंवा सुपर बझारसारख्या ठिकाणी गेल्यानंतर आपण ठरविलेल्या वस्तूंबरोबरच नकळतपणे इतर अनावश्यक वस्तू घेऊ लागतो. सर्व खरेदी झाल्यानंतर किंवा घरी आल्यानंतर या वस्तूंवरील खर्च अधिक झाल्याचे लक्षात येते. त्यामुळे मोठ्या स्टोअरमध्ये गेल्यानंतर अनावश्यक खरेदीचा मोह टाळण्याचे पथ्य पाळले पाहिजे. त्यासाठी घरातून निघतानाच आवश्यक त्या वस्तूंची यादी बरोबर ठेवावी व त्याप्रमाणेच खरेदी होत आहे ना, याचे सतत भान ठेवले पाहिजे.*

*- संग्रहातून*



## स्वप्न साकारत आहे...

*(१ ऑगस्ट हा आमच्या विद्या प्रसारक मंडळाचा स्थापना दिन. त्या निमित्ताने)*

हे स्वप्न नव्हे एका व्यक्तीचे ! ते आहे समाजातील विचारवंतांचे,
हे स्वप्न नव्हे महंमदी मनोऱ्याचे, ते आहे श्रमिक योजनांचे
हे स्वप्न नव्हे खुशालवंतांचे, नव्हे ते आरामितांचे
नसे ते फावल्या क्षणांचे, गुलजार गादीत विसावतांचे
ते असे अहर्निश श्रमांचे, तसे ते असे श्रमोपासकांचे,
सदा ध्येयध्यासीं मग्न त्यांचे !
हे स्वप्न नव्हे व्यक्तिवैभवाचे, नसे ते आत्मगौरवाचे,
ते असे समाजोन्नतीचे, असे ते युवागौरवाचे
हे स्वप्न न दिसे एका क्षणीं, न एका दिनीं,
न एके यामिनी
दिनरात्र मानसी स्फुरे, सतत निद्रानाशही तें करी !
हे स्वप्न नसे सानुले, नसे ते चौकटी बांधिले
ते असे, भव्यता जयाची महान, सीमा जयाची अस्मान !
हे स्वप्न जसे आमुचे, असावे तसे उपस्थितांचे,
मुदित मनीं सुस्वागत अपुलें करितां
स्वप्न दिसे साकारले
आणि हे स्वप्न कसे आहे ते पहा –
ओसाड भूमी कर्दमीं जिथे घाण
द्वीप साजिरे आज तेथे दृश्यमान
ज्ञानसूर्य येथे उगवला, अज्ञान अंधार लोपला,
दिनरात्र प्रकाश अर्पी, अस्त न जया कल्पिला.
भव्य वास्तू इथे साकारती, दृश्य जयाचें महान,
शिल्पही जयांचे विशेषज्ञान देखिती
मनी जे सुजाण,
दृश्य देखतां जाणवे भव्यता, प्रासाद जणूं सरस्वतीचा,
ज्ञानवीणा जिथे झंकारे सदासर्वदा,
बगीचे जिथे बहरती फुलाफुलांचे रंगरंगती,
उद्यानीं बहरती ताटवे, कारंजी जिथे फवारती.
युवायुवतींचे मग्न घोळके, स्वप्न रंगवितां मग्न जे मानसी
स्वप्न तयांचे आकार घेई, अनुरागप्रारंभ येथेच होई
आचार्य आणि प्राचार्य, सदा इथें रंगती
विज्ञानसत्रीं सदा जयांची वाहिली मती,
कलावंत, सरस्वतीचे तन्मणी, तसे वैज्ञानिक महान्,
इथे जन्मती प्रतिभा जयांची देदीप्यमान
भूदल–सागर–सैनिक, वायुपुत्रही इथे निर्मिती
शक्तियुक्ति जयांची भारतमातेप्रती
नवमानव, नवनागरिक, प्रयत्नीं इथे घडतसे
सत्य, शिव, सुंदर जयांचे अणुरेणीं वसे.
बालके तव शिशुमंदिरी दाखल होतां,
विद्यामंदिरी दौड तयाची न रोखितां
नवयुवक हा प्रवेशितां विद्येचे महाद्वार
स्वप्न आमुचे तयाभोवती होई साकार
नवयुवक हा भारतभूचा सुपुत्र व्हावा,
बुद्धि जयाची, शक्ति जयाची भारतभूचा ठेवा

– डॉ. वा. ना. बेडेकर

**Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006**


# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- *अत्याधुनिक दृक्श्राव्य यंत्रणा*
- *वातानुकूलित प्रसन्न वातावरण*
- *वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा*

*अशा सुविधांनी युक्त*

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत, ३ रा मजला | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि.प्र.मं.चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

## ❉ संपर्क ❉

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे – ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक – २५४२६२७०


हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे-४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे – ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.